बातम्या, लेख
व जाहिरातीसाठी
लातूर
समाचार
समर्थनगर धाराशिव
मो.९४२२४७२५०२
व ९१७२३२५७०८

| धाराशिव | वर्ष २५ वे | अंक १६८ वा | गुरूवार दिनांक ११ सप्टेंबर, २०२५ | पृष्ठे ६ | किंमत १.५० ₹
RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
(सांज दैनिक) पोष्ट परवाना
L2/RNP/OMD- 52/24-26
dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

प्रियंका
ढाबा हॉटेल
गड पाटी जवळ
धाराशिव.
रूचकर भोजनासाठी
भेट द्या

## क्राईम न्युज

### पिशवीमधील सोन्याचे दागिणे अज्ञाताने चोरले

धाराशिव (प्रतिनिधी)- धाराशिव शहर पोलीस ठाणे फिर्यादी नामे शबनम मिनाज शेख, वय ३५ वर्षे, रा.शम्सपुरा दर्गा रोड धाराशिव ता. जि. धाराशिव यांचे राहते घराचे कडी कोंडा अज्ञात व्यक्तीने दि.०९.०९.२०२५ रोजी तोडून आतमध्ये प्रवेश करुन घरातील किचन मधील पिशवीमध्ये ठेवलेले १७ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने असा एकुण ९५,००० किंमतीचा माल चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-शबनम शेख यांनी दि.०९.०९.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन धाराशिव शहर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३३१ (३), ३०५ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### बकऱ्याची चोरी करताना हाती लागले

धाराशिव (प्रतिनिधी)-शहर पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी सुरेश अभिमान करवर, वय ४२ वर्षे, रा.राघुचीवाडी ता. जि. धाराशिव यांचे राघुचीवाडी शिवारातील शेत गट नं ५९७ शेडमधील तीन बकरे अंदाजे ३८,००० किंमतीचे हे दि.०८.०९.२०२५ रोजी २३.४० वा. सु. आरिफ रा. टिपु सुलतान चौक धाराशिव, सुरज रा.फकीरा नगर, नुमान रा. फकीरा नगर धाराशिव हे बकरी चोरी करुन घेवून जात असताना फिर्यादी व इतरांनी आरिफ शेख यांना पकडले. अशा मजकुराच्या फिर्यादी -सुरेश करवर यांनी दि.०९.०९.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन धाराशिव शहर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३३१(४),३०३ (२), ३(५) अन्वये गुन्हा नोंदवला आहे. तसेच फिर्यादीने दिलेल्या माहिती वरुन सुरज फकीरा नगर, नुमान यांना ताब्यात घेवून सदर गुन्ह्या बाबत चौकशी केली असता नमुद आरोपींनी सदरचा गुन्हा केल्याची कबुली दिली. पुढील तपास चालु आहे.

### शेळी व बकऱ्याची चोरी

कळंब(प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी धर्मराज मनोहर आंबीरकर, वय ४९ वर्षे, रा. डिकसळ ता. कळंब जि. धाराशिव यांचे डिकसळ शेत शिवारातील शेत गट नं १११ व तांदुळवाडी शिवारा शेत गट नं ८४ मधील पत्राचे शेडचा मागील पत्रा कापून कंपाउंड वरुन आत प्रवेश करुन एक शेळी व एक बोकड व दत्तात्रय तनपुरे यांची एक शेळी असा एकुण १५,२०० किंमतीचे बोकड व शेळ्या या दि.०६.०९.२०२५ रोजी २२.०० ते दि. ०७.०९.२०२५ रोजी १८.०० अज्ञात व्यक्तीने चोरुन नेले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-धर्मराज आंबीरकर यांनी दि.०९.०९.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन कळंब पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३३४ ३०५ (अ) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

**झाडे लावा!
झाडे जगवा!!
झाडे तोड रोखा !!!**

## जिल्हा पत्रकार संघाच्यावतीने शनिवारपासून दोन दिवसीय धाराशिव फेस्टिव्हल

धाराशिव (रामेश्वर डोंगरे)- धाराशिव जिल्हा पत्रकार संघाच्या वतीने यावर्षीपासून दोन दिवसीय धाराशिव महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवार १३ आणि रविवार १४ सप्टेंबर रोजी आयोजित करण्यात आलेल्या या महोत्सवात निमंत्रित कवींचे राज्यस्तरीय कवीसंमेलन आणि भूपाळी ते भैरवी या अस्सल मराठमोळ्या लोककलांचा रांगडा आविष्कार रसिक श्रोत्यांना अनुभवता येणार आहे. नगर परिषदेच्या छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृहात हे दोन्ही कार्यक्रम होणार आहेत. धाराशिव जिल्हा पत्रकार संघाच्या वतीने धाराशिव शहर आणि परिसरातील रसिक श्रोत्यांसाठी मोठी सांस्कृतिक मेजवानी यानिमित्ताने उपलब्ध करून दिली आहे. प्रथमच आयोजित करण्यात आलेल्या या धाराशिव महोत्सवात पहिल्या दिवशी शनिवारी १३ सप्टेंबर रोजी राज्यस्तरीय निमंत्रितांचे कविसंमेलन होणार आहे. यात प्रा. प्रशांत मोरे, मुंबई, भरत दौंडकर, पुणे, अविनाश भारती, माजलगाव, यामिनी दळवी, मुंबई, आणि छत्रपती संभाजीनगर येथील नारायण पुरी, गुंजन पाटील आणि नीलेश चव्हाण या राज्यभर सुपरिचित असलेल्या कवींचा समावेश असणार आहे.

शनिवारी सायंकाळी सहा वाजता कविसंमेलनाच्या माध्यमातून या महोत्सवाचे पहिले पुष्प गुंफले जाणार आहे. रविवारी १४ सप्टेंबर रोजी सांगली येथील संपत कदम यांच्या सांस्कृतिक पथकाच्या 'भूपाळी ते भैरवी' राज्यात आणि देशात गाजत असलेल्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. पहाटेच्या भूपाळीपासून रात्रीच्या लावणीपर्यंत महाराष्ट्राच्या लोककलांचा अस्सल मराठमोळा रांगडा आविष्कार त्यानिमित्ताने अनुभवता येणार आहे. महाराष्ट्रातील विविध लोकसंस्कृतीचे सांगीतिक आणि नृत्याविष्कार सादर करीत लोककलांचे दर्शन घडवणारा हा सांस्कृतिक असणार आहे. हे दोन्हीही कार्यक्रम नगर परिषदेच्या श्री छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृहात १३ आणि १४ सप्टेंबर रोजी सायंकाळी सहा वाजता आयोजित करण्यात आले आहेत. धाराशिवकरांसाठी आयोजित करण्यात आलेल्या या सांस्कृतिक कार्यक्रमासाठी नागरिकांनी उपस्थित रहावे आणि या महोत्सवाचा आनंद घ्यावा असे आवाहन जिल्हा पत्रकार संघाच्या वतीने करण्यात आले आहे.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर ते शिवाजी महाराज पुतळा रस्ता रुंदीकरण ३० मीटर पर्यंत करा -अन्यथा तीव्र आंदोलन!- आर .पी. आय.(खरात गट)चा इशारा!

धाराशिव (शीला उंबरे-पेंढारकर)- धाराशिव शहरातील अत्यंत महत्त्वाचा आणि सांस्कृतिकदृष्ट्या गौरवशाली असलेला डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा ते छत्रपती शिवाजी महाराज पुतळा दरम्यानचा रस्ता आजही अरुंद आणि अपुऱ्या सुविधामुळे नागरिकांची हेळसांड होत आहे.

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (खरात गट) यांनी या रस्त्याचे ३० मीटर पर्यंत तात्काळ रुंदीकरण करण्याची जोरदार मागणी करत, प्रशासनाला थेट इशारा दिला आहे - अन्यथा बौद्ध समाज रस्त्यावर उतरून भव्य आंदोलन छेडेल.

आर.पी.आय. (खरात गट) चे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ राऊत यांच्या नेतृत्वाखाली एका शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी धाराशिव यांना निवेदन सादर केले. या निवेदनात स्पष्टपणे नमूद करण्यात आले की, हा रस्ता केवळ वाहतूक मार्ग नसून, आमच्या श्रद्धेचा आणि सामाजिक अस्मितेचा प्रश्न आहे. दरवर्षी या मार्गावर हजारो नागरिक, विशेषतः बौद्ध बांधव, महामानवांना अभिवादन करण्यासाठी एकत्र येतात. मात्र, अरुंद रस्ता आणि प्रशासनाच्या उदासीनतेमुळे त्यांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागते.

निवेदनात पुढे म्हटले आहे की, सार्वजनिक बांधकाम विभागाने आजवर केवळ तात्पुरत्या उपाययोजना करत वेळ मारून नेली. कोणतीही ठोस कृती न झाल्यामुळे, नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली असून, प्रशासनाचा हा उपेक्षात्मक आणि बेफिकीर दृष्टिकोन निषेधास पात्र आहे.

जर लवकरात लवकर ३० मीटर रुंदीकरणास मंजुरी देण्यात आली नाही, तर बौद्ध समाजाच्या वतीने रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करण्यात येईल. यामुळे निर्माण होणाऱ्या कायदा-सुव्यवस्थेच्या परिस्थितीस प्रशासन पूर्णतः जबाबदार असेल,असा स्पष्ट इशारा राजाभाऊ राऊत यांनी दिला.

त्यांनी पुढे म्हटले की, हा प्रश्न केवळ रस्त्याचा नाही, तर नागरिकांच्या सुरक्षिततेशी, प्रतिष्ठेशी आणि सामाजिक सन्मानाशी निगडीत आहे. यास हलक्यात घेणे धोक्याचे ठरेल.असे निवेदनात म्हटले आहे यावेळी निवेदनावर आर.पी.आय. (खरात) पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजाभाऊ राऊत, राज्य सचिव,राष्ट्रवादी काँग्रेस अल्पसंख्याक विभाग शरीफ शेख, राज्य अतिरिक्त महासचिव,कास्ट्राइब कर्मचारी संघटनचे हरिभाऊ बनसोडे, ज्येष्ठ नेते बाबासाहेब बनसोडे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार प्राप्त विजयकुमार गायकवाड, धम्मपाल बनसोडे, बाबासाहेब माने, तालुकाध्यक्ष संपत्त सरवदे,(माजी संचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर कारखाना), सुग्रीव कांबळे,नागनाथ शिंदे यांच्या सह्या आहेत.

## इंग्रजांशी नरवीर उमाजी नाईक १४ वर्षे लढले

### उमरग्यातील कुमारस्वामी प्राथमिक विद्यामंदिरामध्ये जयंतीनिमित्त कलापे यांचे प्रतिपादन



उमरगा (प्रतिनिधी)- क्रांतिकारकांचा आदर आणि त्यांचे स्मरण सर्वच जाती-धर्मांतील नागरिकांनी केले पाहिजे. उमाजी नाईक यांच्यासमोर छत्रपती शिवरायांचा आदर्श होता. उमाजी नाईक यांना फाशी दिली नसती तर ते दुसरे शिवाजी म्हणून नावारूपास आले असते. दादोजी नाईक यांच्याकडून त्यांनी दांडपट्टा, तलवार, भाते, कुऱ्हाडी, तीरकामठी, गोफणी चालवणे या कला अवगत केल्या होत्या, असे मत शिक्षक सुभाष कलापे यांनी व्यक्त केले. कुमार स्वामी प्राथमिक विद्यामंदिरात आद्यक्रांतिकारक नरवीर राजे उमाजी नाईक यांची जयंती उत्साहात झाली. या वेळी शिक्षक कलापे बोलत होते. मुख्याध्यापक कविराज रेड्डी अध्यक्षस्थानी होते. या वेळी बसवराज साखरे उपस्थित होते. प्रारंभी उमाजी नाईक प्रतिमेचे पूजन केले. या वेळी सुभाष् कलापे म्हणाले, भारताच्या इतिहासात अनेक ऐतिहासिक घटना घडल्या आहेत. त्यात १८५७ च्या उठावाच्या अगोदरही उठाव झाले. पहिल्या उठावाद्वारे इंग्रजांना सलग १४ वर्षे सळो की पळो करून सोडणारे प्रथम क्रांतीचे स्वप्न पाहणारे निधड्या छातीचे वीर आद्यक्रांतिकारक नरवीर ठरले गेले ते राजे उमाजी नाईक. समाजकारण, राजकारण, बालपण व तसेच उमाजी नाईक आणि लहुजी वस्ताद साळवे यांच्यात गुरू-शिष्याचे नाते होते. नरवीर उमाजी नाईक यांचा जन्म रामोशी-बेरड समाजात ७ सप्टेंबर १७९१ पुणे जिल्ह्यातील भिवडी येथे झाला. उमाजी राजेंचे सर्व कुटुंब पुरंदर किल्ल्याच्या संरक्षणाची जबाबदारी पार पाडत होते, त्यामुळेच त्यांना नाईक ही पदवी मिळाली होती. भरत माने यांनी सूत्रसंचालन केले.बसवराज साखरे यांनी आभार मानले. यावेळी शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

१८०३ मध्ये समाजावर उपासमारीची वेळ आली होती या दरम्यानच्या काळात इंग्रजांनी आपली सत्ता स्थापन करण्यास सुरवात करून हळू हळू मराठी मुलुख जिंकत पुणे ताब्यात घेतले. १८०३ मध्ये रामोशी-बेडर समाजावर उपासमारीची वेळ आली असताना उमाजी नाईक बेभान झाला अन स्व:ताच्या अधिपत्याखाली स्वराज्याचा पुकार करत या देशावर परकीयांना राज्य करू देणार नाही, असा पण करत विठुजी नाईक, कृष्णाजी नाईक, खुशाबा रामोशी, बाबू सोल्स्कर आदींना बरोबर घेऊन कुलदैवत जेजुरीच्या खंडोबारायला भंडारा उधळत शपथ घेतली व इंग्रजांविरोधात पहिल्या बंडाची गर्जना केली.

### 'तडजोड शुल्क'वसुल

धाराशिव (प्रतिनिधी)- शहर वाहतुक शाखा व संबंधीत पोलीस ठाण्यांनी महत्त्वाच्या रस्त्यांवर दि.०९ सप्टेंबर रोजी मोटार वाहन कायदा-नियम भंग प्रकरणी एकुण २३८ कारवाया करून १,७९,२५० 'तडजोड शुल्क'वसुल केले आहे.

## हायवेवरुन जाणारे वाहनावर चढुन चोऱ्या करणारे टोळीस दरोड्याच्या तयारीत असताना स्थानिक गुन्हे शाखेने केले जेरबंद

धाराशिव (प्रतिनिधी)- हायवेवरुन जाणारे वाहनावर चढुन चोऱ्या करणारे टोळीस दरोड्याच्या तयारीत असताना स्थानिक गुन्हे शाखेने केले जेरबंद.या बाबत पोलिसाकडून समजलेली माहिती अशी की, मालाविषयी गुन्हे उघडकीस आणणे कामी दि.०८.०९.२०२५ रोजी तेरखेडा येथे हायवेरुन जाणारे ट्रकवर चढुन काही चोरटे ट्रकमधील माल काढत असलेबाबत व्हिडीओ व्हायरल झाला होता. त्यांचा शोध घेणेबाबत आदेशीत केल्याने असे पेट्रोलिंग करीता रवाना होवून येरमाळा येथे आले असता माहिती घेत असताना माहिती मिळाली की, मलकापुर पाटी ते येडेश्वरी मंदीराकडे जाणारे रोडवर मलकापुर गावाचे पुढील बाजूस एका स्कार्पीओ गाडीमध्ये काल तेरखेडा येथे हायवेवरुन जाणारे ट्रकवर चढुन ट्रकमधील माल काढत असलेल्या व्हिडीओमधील चोरटे थांबलेले असुन ते आज येडेश्वरी देवीचे दर्शनासाठी येणारे भाविकांची गाडी आडवून त्यांना लुटण्यासाठी थांबलेले आहेत अशी माहिती मिळाल्याने पथकाने लागलीच पोलीस स्टाफ सह माहिती मिळालेल्या ठिकाणी मलकापुर गावाचे पुढे येडेश्वरी मंदीराकडे जाणारे रोडवर गेले असता पथकास गाडीमधून उतरलेले पाहुन दोघेजण स्कार्पीओमधून उतरुन पळुन जात असताना त्यांचा पाठलाग करुन ताब्यात घेतले. तसेच काही पोलीसांनी स्कार्पीओ मधील चोरट्यांना गाडीतच ताब्यात घेवून त्यांना त्यांचे नाव गाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव- १. अमोल नाना काळे, वय २८ वर्षे, २. किरण बापु पवार, वय २५ वर्षे, ३. दत्ता दादा काळे, वय २१ वर्षे, ४. गणेश नाना काळे, वय ३२ वर्षे, ५. सुभाष तानाजी काळे, वय २४ वर्षे, ६. शिवा रामा पवार, वय २२ वर्षे, सर्व रा. तेरखेडा असे सांगीतले त्यांचा संशय वाटल्याने सदर गाडीची पहाणी केली असता गाडीमध्ये दरोडा टाकण्याचे साहित्य, मोबाईल व महिंद्रा स्कार्पीओ ही गाडी असा एकुण ११,२६,००० चा मुद्देमाल जप्त करुन पोलीस ठाणे येरमाळा येथे गुन्हा दाखल करुन मुद्देमालासह आरोपी हजर केले आहेत. नमुद टोळी मधील तीन आरोपी व स्कापीओ वाहन हे पुणे शहरातील आंबेगाव पोस्टे हद्दीत ५० लाख रुपये चे दरोड्याचे गुन्ह्यामध्ये फरार आरोपी आहेत.

सदरची कामगिरी पोलीस अधिक्षक श्रीमती. शफकत आमना यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. विनोद इज्जपवार, सपोनि श्री. सचिन खटके, पोह/ विनोद जानराव, नितीन जाधवर, पोना/ बबन जाधवर, चापोह / महेबुब अरब, विनायक दहिहंडे, प्रकाश बोईनवाड यांचे पथकाने केली आहे. पोलिस अधिक तपास करीत आहेत

## निरोगी वृद्धत्वासाठी फिजिओथेरपी, शारीरिक हालचाली आवश्यक: फिजिओथेरपी दिन साजरा

उमरगा(प्रतिनिधी)- येथील उपजिल्हा रुग्णालयात वैद्यकीय अधीक्षक डॉ. कोमल गरड-जाधव आणि अस्थीरोगतज्ञ डॉ. राजेश सोनवणे यांचे मार्गदर्शनाखाली जागतिक फिजिओथेरपी दिन सोमवारी साजरा करण्यात आला.

निरोगी वृद्धत्वात फिजिओथेरपी व शारीरिक हालचालींची भूमिका या शीर्षकानुसार विविध उपक्रम घेऊन ज्यात रुग्ण, नातेवाईक, वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांनी उत्साहात व्यायाम करून साजरा केला. २०२५ ची थिम स्वस्थ वृद्धत्वाची संकल्पना (स्वस्थ वृद्धत्व) विषयावर रुग्णालयातील फिजिओथेरपिस्ट डॉ. प्रियंका राठोड यांनी स्वस्थ वृध्दत्वात निरोगी राहण्यास कोणते व्यायाम करावे. वृद्धत्वात शारीरिक स्वास्थ्य आणि गतिशीलता टिकवून ठेवण्यासाठी फिजिओथेरपीची भूमिका महत्त्वाची आहे. ज्यात वृद्ध व्यक्तींना सक्रिय स्वतंत्र जीवन जगण्यासाठी व्यायाम केल्याने वेदना कमी करण्यास मदत होईल जसे की, सांधेदुखी, कंबरदुखी आणि इतर वेदना कमी करण्यासाठी फिजिओथेरपी उपयुक्त आहे. शारीरिक क्षमता सुधारण्यासाठी, स्नायूंची ताकद आणि संतुलन सुधारून पडणे आणि इतर अपघात टाळता येतात. मधुमेह, हृदयविकार व इतर संबंधित रोगांवर नियंत्रण ठेवण्यास मदत करते.

वृद्धापकाळात व्यक्तींसाठी फिजिओथेरपीचे महत्त्व वाढवणे आणि त्यांना सक्रिय जीवनासाठी प्रोत्साहन देणे आवश्यक असल्याचे सांगून प्रात्यक्षिकासह व्यायाम करून दाखवले. या वेळी डॉ. सुनंदा सूर्यवंशी, डॉ. मोमीन हुसेनी, डॉ. ज्योती बोळशेट्टी, डॉ. स्वप्नाली लामतुरे, पंचशिला व्हंताळकर, तुळसा कांबळे, पूजा बायस यांच्यासह आदी उपस्थित होते.

## मुरूम परिसरात ढगफुटी; शेतकऱ्यांचे मोठे नुकसान



मुरूम (सुधीर पंचगल्ले) मुरूम व परिसरात झालेल्या पहाटे तीन ते सहा च्या दरम्यान बुधवारी (ता. १०) रोजी ढगफुटीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या ढगफुटीमुळे सोयाबीन, तूर, उडीद व ऊस पिके पाण्यात बुडाली असून अनेक शेतकऱ्यांचे शेतबांध फुटून सुपीक माती वाहून गेली आहे. या परिसरातील अनेक शेतकऱ्यांच्या शेतामध्ये मोठ्या प्रमाणात पाणी साचले आहे. या परिसरातील मुरूम, अंबरनगर, फुलसिंग नगर, आचार्य तांडा, इंगोले तांडा, तुगाव, बेळंब आदी गावातील शेत पिकांचे नुकसान झाले.

या संदर्भात भाजप मुरूम मंडळाच्या वतीने तहसील कार्यालयात निवेदन नायब तहसीलदार भीमाशंकर बेरुळे व कृषी कार्यालयात कृषी अधिकारी रीतापुरे यांना निवेदन देण्यात आले. या निवेदनावर भाजप मुरूम मंडळ अध्यक्ष निरजानंद अंबर, साईराज टाचले, सुनिल शिंदे, श्रीकांत बेंडकाळे, सुरेश शेळके, रामकृष्ण अंबर, विकास देडे व भाजप कार्यकर्त्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## रुईभर येथे खुल्या वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन

धाराशिव (प्रतिनिधी)- स्वातंत्र्य सेनानी विश्वनाथ आबा कोळगे सोसायटी रुईभर संस्थेच्या वतीने मराठवाडा मुक्ती संग्राम दिन व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त रुईभर ता.धाराशिव येथील जयप्रकाश माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात *मराठवाडा मुक्तिसंग्रामामध्ये धाराशिव जिल्ह्याचे योगदान* या विषयावर सोमवारी दि १५ सप्टेबर रोजी खुल्या वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे या स्पर्धेत प्रथम बक्षीस १५०१/- द्वितीय बक्षीस १००१/- तृतीय बक्षीस ७०१/- तर चतुर्थ बक्षीस ५०१/- अशी बक्षिसे देण्यात येणार आहेत.

सदरील स्पर्धेचा वेळ पाच मिनिटांचा असेल तरी इच्छुक स्पर्धकांनी सोमवार दि १५ सप्टेंबर रोजी सकाळी ९.३० वाजता उपस्थित राहावे. स्पर्धेसाठी नाव नोंदणी तेजसिंह कोळगे . मो. क्रंमाक ९४०५३६००७८ . ९३५६७४२०९० यांच्याशी संपर्क करावा व स्पर्धकांनी जास्तीत जास्त संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन स्वातंत्र्य सेनानी विश्वनाथ आबा कोळगे सोसायटीच्या वतीने करण्यात आले आहे.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## शेतकऱ्यास मदतीची गरज

राज्यात काय देशात पावसाने कहर केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नुकताच पंजाब व हरियणाचा दौरा केला. या दौरा दरम्यान मोठी अर्थिक मदतीची घोषणा केली. तशी महाराष्ट्रासाठी होणे अपेक्षित आहे. राज्यातील विशेष करून मराठवाड्यातील शेतकऱ्याचे मोठे नुकसान झाले आहे. केवळ पंचनामे करून चालणार नाही तर त्यांना आर्थिक मदतीची मोठी गरज आहे. देशच हा कृषिप्रधान आहे. महाराष्ट्रातील बहुसंख्य लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे. दरवर्षी पावसाळा ही शेतकऱ्यांसाठी नवे आशावाद घेऊन येतो, कारण पिकांसाठी पाणी मिळणे हा त्यांच्या उपजीविकेचा गाभा आहे. परंतु मागील काही वर्षांत हवामानातील अनिश्चिततेमुळे महाराष्ट्रात पावसाच्या स्वरूपात मोठे बदल दिसून येत आहेत. कधी अतिवृष्टी, कधी अवकाळी पाऊस, तर कधी दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण होते. यामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. २०२४-२५ च्या पावसाळ्यातही अशीच परिस्थिती महाराष्ट्राने अनुभवली. पावसामुळे केवळ शेतीच नाही तर जनजीवन, अर्थव्यवस्था आणि सामाजिक रचनेवरही मोठे परिणाम झाले. गेल्या काही वर्षांत महाराष्ट्रात पावसाचे प्रमाण अस्थिर झाले आहे. एकीकडे काही भागांत मुसळधार पाऊस पडतो, तर दुसरीकडे काही भागात पावसाचा थेंबही पडत नाही. यामुळे शेती व्यवस्थापन आणि जलसंपत्तीचे नियोजन करणे कठीण झाले आहे. मार्च-एप्रिलमध्ये, तसेच सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये अवेळी पावसामुळे पिकांचे नुकसान होते. विदर्भ, मराठवाडा आणि कोकण भागात अतिवृष्टीमुळे नद्यांना पूर येतो आणि गाव पाण्याखाली जातात. शेतीवरील परिणाम महाराष्ट्रात दरवर्षी जवळपास १.४ कोटी हेक्टर क्षेत्रावर खरीप पिके घेतली जातात. परंतु या वर्षी मुसळधार पावसामुळे लाखो हेक्टरवरील शेती पाण्याखाली गेली. धान, सोयाबीन आणि कापूस या पिकांचे सर्वाधिक नुकसान झाले. भाजीपाला आणि फळबागा मध्ये टोमॅटो, कांदा, मिरची, डाळिंब, द्राक्षे, केळी या नाजूक पिकांचे नुकसान झाले. काही ठिकाणी उभ्या ऊसाच्या पिकावर पाण्याचा दाब आल्यामुळे पिके आडवी पडली. फळबागांचे नुकसान महाराष्ट्र हे डाळिंब, द्राक्षे आणि केळीचे मोठे उत्पादन करणारे राज्य आहे. परंतु अवकाळी पावसाने या बागांवर कहर केला. बीड जिल्ह्यात डाळिंब बागांची पाने गळाली, फळे सडली आणि शेतकऱ्यांचा लाखोंचा तोटा झाला. नाशिक परिसरात द्राक्षबागांवर बुरशीजन्य रोग पसरला, निर्यात धोक्यात आली. त्याच प्रमाणे जालना, छत्रपती संभाजीनगरमध्ये केळी आणि संत्रा बागा मोठ्या प्रमाणात प्रभावित झाल्या. बागायती पिके ही शेतकऱ्यांसाठी दीर्घकालीन गुंतवणूक असते. त्यामुळे यामुळे होणारा तोटा भरून काढणे खूप अवघड ठरते. पशुधन व ग्रामीण जीवनावर परिणाम मोठ्या प्रमाणता झाला असून पावसामुळे अनेक ठिकाणी गोठे पाण्याखाली गेले. गायी, म्हशी, मेंढ्या, शेळ्या वाहून गेल्या किंवा रोगराईमुळे मृत झाल्या. नांदेड, वाशिम, परभणी येथे पशुधनाचे मोठे नुकसान झाले. ग्रामीण भागात शाळा, रस्ते, अंगणवाड्या पाण्याखाली गेल्या. वाहतूक विस्कळीत झाली, बाजारपेठा बंद राहिल्या. अनेक कुटुंबांना आपली घरे सोडून सुरक्षित ठिकाणी जावे लागले. रस्ते, पूल, वीजपुरवठा, पाणीपुरवठा व्यवस्था खंडित झाली होती. शेती आणि जनजीवनावर झालेल्या या आपत्तीमुळे राज्याच्या अर्थव्यवस्थेला मोठा धक्का बसला असून पावसाच्या तडाख्यात शेतकरी सर्वाधिक भरडले जात आहेत. मेहनतीचे पिक एका रात्रीत पाण्याखाली गेले. कर्ज फेडणे कठीण होणार होते. विमा योजनांचे पैसे उशिरा मिळतात. मानसिक ताण वाढतो आणि काही शेतकरी आत्महत्या करतात. ही परिस्थिती केवळ आर्थिकच नाही तर मानसिक व सामाजिक संकट निर्माण करणारी आहे. दीर्घकालीन परिणाम अन्नसुरक्षा धोक्यात येते पिकांचे उत्पादन घटल्याने बाजारात तुटवडा निर्माण होतो. महागाई वाढते वाढून कांदा, टोमॅटो यासारख्या भाजीपाल्याचे दर आकाशाला भिडतात. ग्रामीण भागातील नागरिक स्थलांतर करतात. शेतकरी हतबल होऊन शहरांकडे स्थलांतर करतात. महाराष्ट्रात पावसामुळे झालेले नुकसान हे केवळ एक नैसर्गिक संकट नसून सामाजिक-आर्थिक आव्हान आहे. शेतकऱ्यांचे भविष्य, ग्रामीण भागाचे अस्तित्व आणि राज्याची अन्नसुरक्षा या सर्व गोष्टी पावसावर अवलंबून आहेत. हवामान बदलाची गंभीरता लक्षात घेऊन शासन, समाज आणि शेतकरी यांनी एकत्र येऊन शाश्वत उपाययोजना राबवणे ही काळाची गरज आहे. सरकारने केवळ तातडीने पंचनामे करावेत असे जाहिर केले आहे. प्रत्यक्षात या कामाला म्हणावी तशी गती दिसून येत नाही. राज्यात अचानक कोसळलेल्या पावसाने आर्थिक गणित बिघडले आहे. आगामी काळात दसरा व दिवाळी ही मोठी सण आहेत. गरीबापासून श्रीमंतापर्यंत हा सण साजरा करतात. त्यामुळे आर्थिक मदतीची गरज आहे. ही मदत केवळ सरकारने हातभार लावल्याशिवाय शक्य नाही. तसे पाहिले तर फारमोठे संकट शेतकऱ्यावर या अतिवृष्टीमुळे आले आहे. सरकारचे म्हणावे तेवढे लक्ष दिसून येत नाही. अद्याप शेतकऱ्याचे किती नुकसान झाले याचा तरी तपशील शासनाकडे असणे आवश्यक आहे. शेतकरी कोलमोडला तर बाजारात शुकशुकाट दिसून येतो. शेतकरीच खरेदीसाठी खिशातून पैसा बाहेर काढतात. सोयाबिन असो किंवा अन्य धान्याची पट्टी म्हणजे पैसा हाती येताच तोच पैसा शहरी भागात वस्तू खरेदीसाठी तेथेच खरेदी करतात. बाकीचे नोकरदार वर्ग शेतकऱ्याएवढा खर्च करीत नाहीत. दिलदार हा शेतकरीच आहे त्यामुळे शेतकऱ्याकडे लक्ष देणे काळाची गरज आहे. सरकारने या बाबत गांभीरपनेपहाणे आवश्यक आहे.

# मध्य रेल्वेने १७.१९ लाख प्रकरणांतील अनधिकृत आणि विनातिकीट प्रवाशांकडून १०० कोटींहून अधिक रुपये दंड म्हणून वसूल केला

**मुंबई/प्रतिनिधी :** मध्य रेल्वेने आपल्या प्रवाशांना सुरक्षित, सुरळीत आणि आरामदायी प्रवास अनुभव देण्याच्या अढळ बांधिलकीत, अनधिकृत आणि विनातिकीट प्रवाशांना रोखण्यासाठी आपले प्रयत्न वाढवले आहेत. जोरदार आणि नियमित तिकीट तपासणी मोहिमांद्वारे, रेल्वेने आर्थिक वर्ष २०२५-२६ (एप्रिल ते ऑगस्ट २०२५) दरम्यान लक्षणीय परिणाम साधले आहेत.

या काळात, मध्य रेल्वेच्या समर्पित तिकीट तपासणी टीमने तिकीटाशिवाय, अयोग्य तिकीटासह किंवा अवैध प्रवास करणाऱ्या १७.१९ लाख प्रवाशांना ताब्यात घेतले आणि विक्रमी दंड रु.१००.५० कोटी वसूल केला.

ऑगस्ट २०२५ महिन्यात, मध्य रेल्वेच्या तिकीट तपासणी टीमने २.७६ लाख प्रवाशांना विनातिकीट/वैध तिकीटाशिवाय प्रवास करताना ताब्यात घेतले, जे ऑगस्ट २०२४ मधील २.३४ लाख प्रवाशांशी तुलना करता १८% वाढ दर्शवते.

ऑगस्ट २०२५ मध्ये विनातिकीट/वैध तिकीटाशिवाय प्रवास करणाऱ्यांकडून रु.१३.७८ कोटी दंड वसूल केला गेला, तर ऑगस्ट २०२४ मध्ये या दंडाची रक्कम रु८.८५ कोटी होती, यामुळे ५५% पेक्षा जास्त वाढ दिसून येते.

आर्थिक वर्ष २०२५-२६ (एप्रिल ते ऑगस्ट-२०२५) साठी विनातिकीट/वैध तिकिटाशिवाय प्रवास करताना पकडलेल्या प्रवाशांची विभागवार माहिती आणि त्यांच्याकडून वसूल केलेल्या दंडाची रक्कम खालीलप्रमाणे आहे:

भुसावळ विभागात ४.३४ लाख प्रकरणांमधून ३६.९३ कोटी रुपये,

मुंबई विभागात ७.०३ लाख प्रकरणांमधून २९.१७ कोटी रुपये,

नागपूर विभागात १.८५ लाख प्रकरणांमधून ११.४४ कोटी रुपये

पुणे विभागात १.८९ लाख प्रकरणांमधून १०.४१ कोटी रुपये

सोलापूर विभागात १.०४ लाख प्रकरणांमधून ५.०१ कोटी रुपये आणि

मुख्यालयात १.०४ लाख प्रकरणांमधून ७.५४ कोटी रुपये

मध्य रेल्वे अनधिकृत प्रवाशांना शोधण्यासाठी बहुआयामी धोरण अवलंबते ज्यामध्ये स्टेशन तपासणी, ॲम्बुश तपासणी, किल्ल्याची तपासणी, सघन तपासणी आणि मेगा तिकीट तपासणी मोहिमा समाविष्ट आहेत. ही कारवाई मेल/एक्सप्रेस गाड्या, प्रवासी गाड्या, विशेष गाड्या तसेच मुंबई आणि पुणे विभागातील उपनगरीय गाड्यांमध्ये केली जाते.

तिकीट फसवणूक रोखण्यासाठी आणि महसूलाची हानी टाळण्यासाठी मध्य रेल्वेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलत



UTS मोबाइल ॲपद्वारे स्थिर QR कोडने तिकीट बुकिंग थांबवली आहे, कारण प्रवाशांकडून त्याचा व्यापक गैरवापर झाल्याचे अहवाल प्राप्त झाले होते.

QR कोड प्रणाली बंद केल्यामुळे पेपरलेस तिकीटिंगच्या गैरवापरीवर आता नियंत्रण आले आहे.

मध्य रेल्वे द्वारे प्रवाशांना आवाहन करण्यात येते की, योग्य आणि वैध तिकीट खरेदी करून सन्मानपूर्वक आणि जबाबदारीने प्रवास करावा, जेणेकरून असुविधा आणि दंड टाळता येईल. रेल्वे तिकीटशिवाय प्रवासाबाबत शून्य-सहनशील धोरण पुनरावृत्त करते आणि प्रवाशांना आरामदायी व सन्मानपूर्वक प्रवास सुनिश्चित करण्यास कटिबद्ध राहते.

# दयानंद विज्ञान महाविद्यालयात संगणकशास्त्र विभागातर्फे शिक्षक दिनानिमित्त विविध उपक्रम



**लातूर/प्रतिनिधी :** येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयातील संगणकशास्त्र विभाग व संगणकशास्त्र फोरमच्या माध्यमातून भारतरत्न डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिवस शिक्षक दिन म्हणून साजरा करण्यात आला.महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे यांनी शिक्षक दिनानिमित्त सर्वांना शुभेच्छा दिल्या.याप्रसंगी आयक्यूएसी समन्वयक डॉ.जमन अंगुलवार,संगणकशास्त्र विभाग प्रमुख डॉ.रोहिणी शिंदे,भौतिकशास्त्र विभाग प्रमुख कॅप्टन डॉ.विजेंद्र चौधरी,संगणकशास्त्र विभाग समन्वयक डॉ.संगीता जाजू पदव्युत्तर विभाग समन्वयक प्रा.सुजाता काळे,सीएस फोरएम समन्वयक प्रा.गोविंद बांगड यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी प्रमुख पाहुणे डॉ.विजेंद्र चौधरी यांनी सीएस फोरमच्या प्रयत्नांची प्रशंसा केली आणि संगणकशास्त्र विभाग सर्वात सक्रिय विभाग असून सर्व विद्यार्थीही उत्साही आहेत असे ते म्हणाले तर डॉ.श्रेयस माहूरकर यांनी पोस्टर सादरीकरण स्पर्धेतील सर्व सहभागी आणि विजेत्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले तसेच डिजिटल साक्षरता कार्यक्रमात सहभागी झाल्याबद्दल शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचेही कौतुक केले.याशिवाय आयआयसीबद्दलही सविस्तरपणे माहिती सांगितली.सीएस फोरम समन्वयक प्रा.गोविंद बागड यांनीही मनोगत व्यक्त केले.अध्यक्षीय समारोप करताना आयक्यूएसी समन्वयक डॉ.जमन अंगुलवार

यांनी शिक्षक दिनानिमित्त आपले विचार मांडले आणि संपूर्ण विभागाचे अभिनंदन केले.

प्रास्ताविक फोरम अध्यक्ष गौरी जाजू या विद्यार्थिनीने केले तर आभार वैभवी मार्डीकर हिने मानले.सूत्रसंचालन प्रज्वल लामतुरे व ओंकार चव्हाण या विद्यार्थ्यांनी संयुक्तरित्या केले.शिक्षक दिनानिमित्त सर्व प्राध्यापकांना गुलाबपुष्प देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला.यावेळी आशिष भुसनीकर,कदम अर्पिता,बिरादार माहेश्वरी या विद्यार्थ्यांनी काव्यवाचन केले तर प्रतीक्षा कांबळे,प्राजक्ता बिडवे,विश्वजीत सादेवाड,आदर्श वाघमारे, श्रावणी सारडा या विद्यार्थ्यांनी शिक्षक दिनाविषयी मनोगत व्यक्त केले.तसेच सोनाक्षी ढोक,प्रिती खानपुरे आणि श्रावणी सारडा यांनी गीतगायन केले.रुतुजा गंगणे हिने शायरी म्हटली.याप्रसंगी संगणकशास्त्र विभागातील व इतर विभागातील प्राध्यापक,शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

# इर्शाद भैय्या सय्यद मित्र मंडळाच्या वतीने ईद मिलादुन्नबी निमित्त भव्य रक्तदान शिबीर संपन्न

**लातूर/प्रतिनिधी :** ईद मिलादुन्नबी निमित्त लातूर चे युवा नेते इर्शाद भैय्या सय्यद यांच्या मित्र मंडळाच्या वतीने जूना गाव भागात मदीना मोहल्ला, काळे गल्ली लातूर. येथे शासकिय रक्तपेढीत भव्य रक्तदान शिबिर घेण्यात आले. या रक्तदान शिबिरात १५० पुरुष ३१ महिला असे १८१ रक्तदात्यांनी रक्तदान केले. ईद ए मिलादुन्नबी निमित्त हा कार्यक्रम राबविण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजक इर्शाद भैय्या सय्यद व त्यांचे युवा कार्यकर्ते आणि शेख याकूब गुत्तेदार यानी सहकार्य केले. शेख इस्माईल,असद खोरीवाले,शेख जाकीर सर, सय्यद आसिफ,शेख इब्राहिम शेख,अस्लम शेख, अजहर सय्यद,वसीम सय्यद, मोहसीन मेहबूब सय्यद,पठाण शबाझ, शेख शाहरुख, हमीद शेख,इम्रान शेख,मोहसीन शेख, अकबर शेख, सय्यद सिराज, शेख सैफुलला,खिजर शेख, हुसेन शेख,वसीम तांबोळी, शेख उमर, शेख सोहेल, शेख सोनू, पठान सोनू, व मोहल्ला कमिटीच्या सर्व पदाधिकाऱ्यांचे योगदान महत्वाचे ठरले.

# महावितरण चे परिक्षीत ठाकुर यांच्या कार्याचा गौरव

**लातूर/प्रतिनिधी :** महावितरण लातुर डिव्हीजन व मुरुड सबडिवहीजन अंतर्गत बोपला विभाग सावरगाव चे आदर्श व उत्कृष्ट कर्मचारी श्री परिक्षीत भरतसिंह ठाकुर यांचा नुकताच काम करत असलेली शैली बघुन महावितरण लातुर डिवहीजन कार्यालयात व बोपला कार्यलयात सत्कार करण्यात आला.

सावरगाव चे स्मार्ट मिटर १०० टक्के बदलुन सावरगाव स्मार्ट मिटरमय करून लातुर डिवहीजन मध्ये प्रथम क्रमांक मिळविला स्मार्ट मिटर चांगले असल्याने विज ग्राहकांना पटवुन देवुन मेहनत घेवुन मिटर बदलल्या बद्दल कार्यकारी अभियंता अनिरुद्ध घाटगे साहेब यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.



परिक्षीत ठाकुर यांना चाचणी विभागाचा अनुभव असतानाही तेथुन प्रशासकिय बदली आगसट २०२४ मध्ये करण्यात आली होती एक वर्षात साईड वरचा अनुभव घेत घेत विविध विक्रम अवघ्या एक वर्षात सावरगाव मध्ये करण्यात आले जसे की मार्च मध्ये विज गाहकांची वसुली यादी झिरो केली , सावरगाव मध्ये केबल टाकुन आकडे मुक्त केले. मिटर वाढवले त्यामुळे विज ग्राहक संख्या वाढवली, शेती चा भाग वेगळा व गावठाण भाग वेगळा केल्याने चोविस तास गावातील ग्राहकांना थ्री फेज सप्लाय देण्यात आला. महिन्याचे महिन्याला लाईट बिल भरण्याची सवय लावली हे सर्व अवघ्या एक वर्षाच्या आत करण्यात आले कमी वेळेत जास्त कामे करुन विज ग्राहकांना लळा लावुन प्रामाणिक पणे काम करत असल्याबद्दल या सर्व गुणांचा लेखाजोखा बघुन वरिष्ठ अधिकाऱ्यांनी सत्कार करुन प्रोत्साहन दिले. यावेळी उपकार्यकारी अभियंता शैलेश पाटील, अजित जैन, दयानंद बनसोडे, गजानन लवहराळे, बोपला कार्यालयात अभियंता सलीम शेख यांनी परिक्षीत ठाकुर यांचा सत्कार केला.

यावेळी प्रधान तंत्रज्ञ कल्याण जी मस्के , वरिष्ठ तंत्रज्ञ मुंढे , राजु पवार.,आर शिंदे ,राज मगर , नाडे, आदी. कर्मचारी उपस्थित होते. परिक्षीत ठाकुर यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे

# आचार्य विनोबा भावे: एक जीवन, अनेक क्रांती!

काही माणसे जन्माने मोठी होतात, तर काही त्यांच्या कर्माने. आचार्य विनोबा भावे हे असेच एक व्यक्तिमत्त्व होते, ज्यांनी आपले जीवन मानवतेच्या सेवेसाठी समर्पित केले. महात्मा गांधींच्या विचारांनी प्रेरित होऊन, त्यांनी केवळ स्वातंत्र्यलढ्यात भाग घेतला नाही, तर स्वातंत्र्यानंतरही देशातील सर्वात मोठ्या समस्यांवर तोडगा काढण्यासाठी आपले जीवन वेचले. भूदान आणि ग्रामदान सारख्या क्रांतिकारी चळवळींद्वारे त्यांनी लाखो लोकांच्या जीवनात बदल घडवून आणला. ११ सप्टेंबर रोजी त्यांची जयंती यानिमीत्त त्यांना विनम्र अभिवादन

त्यांनी आपल्या आयुष्याने केवळ देशालाच नव्हे, तर संपूर्ण जगाला एक नवा विचार दिला. विनायक नरहर भावे म्हणून जन्माला आलेल्या या व्यक्तीला महात्मा गांधींनी आचार्य ही उपाधी दिली, कारण त्यांनी केवळ ज्ञान दिले नाही, तर ते जगले. हिमालयातील आध्यात्मिक शांती आणि बंगालच्या क्रांतिकारकांचा ज्वलंत विचार या दोन्हींचा संगम त्यांना गांधीजींमध्ये सापडला आणि तिथूनच त्यांच्या जीवनाची दिशा बदलली.

विनोबा भावे यांचा भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील सहभाग केवळ एक सैनिक म्हणून नव्हता, तर तो एक विचार म्हणून होता. १९४० साली महात्मा गांधींनी जेव्हा वैयक्तिक सत्याग्रह पुकारला, तेव्हा पहिले सत्याग्रही म्हणून त्यांनी विनोबांची निवड केली. हा केवळ एक राजकीय निर्णय नव्हता, तर तो अहिंसक क्रांतीसाठी एका



समर्पित आत्म्याच्या निवडीचा क्षण होता. अनेकदा तुरुंगवास भोगूनही विनोबांचा विचार अधिक प्रगल्भ होत गेला.

स्वातंत्र्यानंतर देशासमोर भूमी वाटपाची मोठी समस्या उभी राहिली. १९५१ मध्ये तेलंगणातील पोचमपल्ली गावातून सुरू झालेली भूदान चळवळ हे विनोबांच्या दूरदृष्टीचे सर्वात मोठे उदाहरण आहे. त्यांनी कोणताही कायदा, बळाचा वापर न करता, फक्त प्रेमाच्या आणि समजुतीच्या बळावर श्रीमंत भूधारकांना त्यांची जमीन गरिबांना दान करण्यासाठी प्रेरित केले. ‘‘प्रेमानेच दरोडा‘‘ या त्यांच्या अनोख्या संकल्पनेतून त्यांनी हजारो एकर जमीन गोळा केली. यातूनच पुढे ग्रामदान चळवळ उभी राहिली, जिथे गावातील सर्व भूमी सामुदायिक मालकीची करण्यात आली. हे केवळ जमिनीचे वाटप नव्हते, तर समाजात समानता आणि सहकार्याची भावना रुजवण्याचे एक मोठे सामाजिक आंदोलन होते.

विनोबा भावे यांनी केवळ सामाजिक कार्य केले नाही, तर भारतीय तत्त्वज्ञानाला एक नवी ओळख दिली. भगवद्गीतेचे त्यांनी केलेले मराठी भाषांतर गीताई हे त्याचे उत्कृष्ट उदाहरण आहे. अत्यंत सोप्या आणि प्रासादिक भाषेत त्यांनी गीतेतील गहन तत्त्वज्ञान सामान्य माणसांपर्यंत पोहोचवले. गीता ही माझी माता आहे असे गांधीजी म्हणायचे, त्याचप्रमाणे विनोबांनी गीताई माउली माझी असे म्हणून या ग्रंथाशी आपले आध्यात्मिक नाते जोडले. याशिवाय, सर्वोदय (सर्वांचे उत्थान) या तत्त्वज्ञानावर आधारित त्यांचे विचार आजही प्रासंगिक आहेत. महिला सक्षमीकरण आणि स्थानिक स्वराज्य संस्थांना बळकट करण्याचे त्यांचे विचार त्यांच्या दूरदृष्टीचे प्रतीक आहेत.

आपल्या आयुष्याच्या शेवटच्या टप्प्यात, आजारपणामुळे शरीर साथ देत नाही हे लक्षात आल्यावर, विनोबांनी जैन परंपरेतील समाधी मरण स्वीकारले. त्यांनी अन्न, पाणी आणि औषधे घेणे सोडून दिले आणि १५ नोव्हेंबर १९८२ रोजी शांतपणे देह त्यागला. हा निर्णय त्यांच्या संपूर्ण आयुष्यातील आध्यात्मिक आणि वैचारिक निष्ठेचा कळस होता.

आजही विनोबा भावे यांचे विचार आपल्याला अहिंसा, मानवता आणि सेवा या मूल्यांची आठवण करून देतात. त्यांचा वारसा केवळ भूदान चळवळीपुरता मर्यादित नाही, तर तो प्रत्येक हृदयात रुजलेला आहे, जो समाजातील विषमतेवर मात करून एकत्र येण्याची प्रेरणा देतो. विनोबांनी म्हटले होते, ‘‘माझे सर्व कार्य हृदयांच्या संगमासाठी असेल.‘‘ त्यांच्या या शब्दांमध्येच त्यांच्या संपूर्ण जीवनाचा अर्थ दडलेला आहे.

**–राहुल हरिभाऊ इंगळे पाटील**
**मो. ९८९०५७७१२८**

देशात एकूण पिकणाऱ्या कांद्यांपैकी जवळपास ८० टक्के कांदा हा रब्बी हंगामात पिकतो. तर खरिपात पिकणारा ३० टक्के कांदा मधल्या काळात बाजारात कमी पडतो. त्यामुळे नोव्हेंबरपर्यंत दरवर्षी ग्राहकांना कांद्याचा तुटवडा भासतो. परिणामी, शासन यात हस्तक्षेप करते आणि दर नियंत्रणात ठेवण्यासाठी विविध मार्गांने कांदा दरावर बंधने आणली जातात. म्हणजेच किमान निर्यात दर जाहीर करणे, हमीभावाने कांदा खरेदी करून खुल्या बाजारात नाफेडमार्फत कांदा विक्री करणे इत्यादी मार्ग अवलंबले जातात.
नाशिक जिल्ह्यात काही महिन्यांपूर्वी लोकसभा निवडणुकीत कांदा हा मुख्य चर्चेचा विषय होता. याच कांद्यामुळे भाजपचे मोठे नुकसान झाले आहे.
लोकसभा निवडणूक निकालाच्या आधी हा प्रश्न मार्गी लागण्याऐवजी अधिकच गुंतागुंतीचा होत आहे. नाफेडचे अध्यक्ष जेठाभाई अहिर यांनी जिल्ह्यातील ङ्गनाफेडफच्या कांदा खरेदी-विक्री केंद्रांना अचानक दिलेल्या भेटीत कांदा खरेदीत गैरप्रकार होत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यामुळे नाफेड, एनसीसीएफ अधिकारी आणि व्यापारी यांचे अर्थपूर्ण संबंधदेखील समोर आले आहे. कांद्यांची विनाअट निर्यात करण्यास मुभा दिल्यास कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या पदरात काहीतरी पडेल. राज्यामध्ये केंद्र सरकारच्या नाफेड आणि एनसीसीएफ या दोन संस्थांनी शेतकऱ्यांचा कांदा खरेदी करून देखील पैसे न दिल्याने बळीराजा आता हवालदिल झाला आहे. याबाबत चौकशी करण्यास गेले असतानादेखील या दोन्हीही संस्थांचे अधिकारी काहीही उत्तर देण्यास तयार नाही. त्यामुळे सणासुदीच्या दिवसात कांदा उत्पादक पैशाअभावी अनंत अडचणींना सामोरे जावे लागत असल्याची परिस्थिती आहे.
मागील काही दिवसांपासून सतत कांद्यांचा प्रश्न हा गाजत आहे. कधी कांद्यांचे भाव कमी होतात, तर कधी कांद्यांचे भाव वाढत आहे. कांद्यांचे भाव स्थिर राहावे यासाठी म्हणून केंद्र सरकारच्या उपभोक्ता मंत्रालयाने कृषी मंत्रालयाच्या सहकार्यातून ङ्गनाफेडफ व ङ्गएनसीसीएफफ या दोन एजन्सीच्या माध्यमातून कांदा खरेदी करून तो बाजारात कमी भावामध्ये आणण्याचे ठरवले आणि त्या दृष्टिकोनातून प्रत्यक्ष कामकाजाला सुरुवात झाली.
देशाच्या एकूण कांदा उत्पादनापैकी नाशिक जिल्ह्यात ९० टक्के उत्पादन व निर्यात केली जात आहे. केंद्र सरकारने यंदा बफर स्टॉकसाठी मनाफेडफ, मएनसीसीएफफच्या माध्यमातून नाशिकसह धुळे, छत्रपती संभाजीनगर, नगर, पुणे, बीड, धाराशिव, सोलापूर आदी जिल्ह्यांतील शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या महासंघांना निवेदनाद्वारे कांदा खरेदीचे उद्दिष्ट ठरवून दिले आहे. संबंधित शेतकरी उत्पादक कंपन्यांचा महासंघ व शेतकरी उत्पादक कंपन्यांनी प्रत्यक्ष शेतकऱ्यांकडून कांदा खरेदी करणे आवश्यक होते; परंतु संबंधित शेतकरी उत्पादक कंपन्यांनी आधीच स्वस्त दरातील कांदा गोदामात भरून ठेवला होता. पाच लाख मेट्रिक टन कांदा खरेदी करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत तरी कांद्याने वांदा करू नये, यासाठी शासनस्तरावर



# कांद्यांचा वांदा केव्हा मिटणार?

हालचाली सुरू झाल्या आहे. प्रत्येकी अडीच लाख टन आता ङ्गनाफेडफचे कांदा खरेदीचे दर वाढल्यानंतर हाच स्वस्तातील कांदा ङ्गनाफेडफसाठी खरेदी केल्याचे दाखविले आहे. शेतकऱ्यांकडू कांदा खरेदी न करता बाजार समित्यांमधील व्यापाऱ्यांकडून खळ्ळ्यांवरील कांदा खरेदी केला जात होता. याचा अर्थ असा आहे की, शेतकऱ्यांकडून थेट कांदा न घेता, व्यापारी शेतकऱ्यांच्या शेतातून (खळ्यांवरून) स्वस्तात कांदा विकत घेऊन तो नाफेडसारख्या शासकीय यंत्रणांना विकत होते, या प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार आणि गैरव्यवहार झाले आहेत. यामुळे सरकारी यंत्रणा खरेदी करत असलेल्या कांद्याच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.काही दिवसांपासून केंद्राच्या वाणिज्य मंत्र्यांनी आता कांदा भावप्रकरणी हस्तक्षेप करण्यास सुरुवात केली आहे. नाफेड जिल्हास्तरावर कांद्यांचा भाव ठरवते. त्याऐवजी आता लोखंड, सिमेंट याप्रमाणेच ङ्गएक देश एक कांदा भावफ असे धोरण केंद्र सरकार लागू करण्याची शक्यता आहे. त्याचे दोन दिवस प्रयोगदेखील झाले. सातत्याने शेतकरी मागील काही दिवसांपासून ङ्गनाफेडफ व ङ्गएनसीसीएफफ या दोन्हीही एजन्सीच्या कारभाराबाबत नाराजी व्यक्त करत आहे. या दोन्ही संस्थांकडून मोठ्या प्रमाणावर बोगस कांदा खरेदी झाली आहे. अशा स्वरूपाच्या तक्रारीदेखील उपभोक्ता मंत्रालयाकडे करण्यात आलेल्या होत्या. पण त्या दृष्टिकोनातून सुरुवातीला कारवाई झाली नाही, पण याबाबत ज्यावेळी केंद्र सरकारच्याच लक्षात काही गोष्टी आल्यानंतर त्यांनी त्याची चौकशी केली. नाशिकच्या नाफेड व एनसीसीएफमधील अधिकाऱ्यांवरती कारवाईदेखील केली आणि त्यानंतर काही प्रमाणात हा पुरवठा सुरळीत होईल यातून मार्ग निघेल अशी अपेक्षा असतानादेखील ती प्रत्यक्षात खरी होऊ शकली नाही. आता तर किंमत स्थिरीकरण निधी योजनेअंतर्गत ङ्गनाफेडफ व ङ्गएनसीसीएफफ या दोन नोडल एजन्सीने व शेतकरी कंपन्यांच्या माध्यमातून प्रामुख्याने नाशिक, अहिल्यानगर, पुणे व छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यांमध्ये ३ लाख टन कांद्याची खरेदी केली. दोन महिने उलटूनही कांदा विक्री केलेल्या शेतकऱ्यांना कष्टाचे पैसे मिळालेले नाही. परिणामी, ऐन सणासुदीच्या काळात शेतकऱ्यांना खरेदीदारांचे उंबरे झिजवावे लागत आहे. बफर स्टॉकसाठी खरेदी करण्यात आलेला कांदा सध्या खरेदीदार संस्थांच्या ताब्यात आहे. खरेदीवेळी ७२ तासांत पैसे मिळतील असे सांगण्यात आले. मात्र आता दोन महिने उलटूनही पैसे खात्यावर आले नाही. यामागे कांदा खरेदी व प्रत्यक्ष उपलब्ध साठ्याचा ताळमेळ लागत नसल्याने हे पैसे ग्राहक व्यवहार विभाग अदा करत नसल्याचे सांगण्यात येत आहे. या सर्व व्यवहारामुळे आता कांदा उत्पादक शेतकरी हवालदिल झाले असून कांदा विकूनही हातामध्ये पैसा नाही त्यामुळे सण कसा साजरा करावा, नवीन पेरणी कशी करावी यासारख्या विवंचनेत शेतकरी वर्ग आहे. आता ङ्गनाफेडफ, ङ्गएनसीसीएफफच्या आर्थिक व्यवहाराप्रश्न चौकशी समिती गठित करण्यात येणार असल्याचे सांगितले. त्यामुळे कुंपणच शेत खातेय, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे आपलेच सरकार धूळफेक करतेय का? असा प्रश्न निर्माण झाला आहे. यापुढे पारदर्शक कांदा खरेदीसाठी सरकार ठोस, सूक्ष्म आणि जबाबदारी निश्चित करणारे नियोजन करेल अशी अपेक्षा या निमित्ताने व्यक्त करू या..

## उपदेशकथा: समानता

एकदा महाराज अजितसिंह यांनी दरबारी लोकांसाठी एक नृत्याचा कार्यक्रम आयोजिला होता. स्वामी विवेकानंद त्यांचे पाहुणे असल्याने महाराजांनी त्यांनाही निमंत्रण पाठवले पण स्वामीजींनी त्यांना स्पष्ट नकार कळविला आणि आपण संन्यासी असल्याने अशा नाचगाण्याच्या कार्यक्रमांना आपण उपास्थित राहू शकत नाही, असे सांगितले. त्या नर्तकीला जेव्हा ही गोष्ट कळली तेव्हा तिला फार दु:ख झाले. स्वामीजींच्या नकाराला उत्तर म्हणून तिने सूरदासाचे एक भजन आळवण्यास प्रारंभ केला. ङ्गप्रभू मेरो अवगुण चित न धरो : समदर्शी है नाम तिहारो, चाहे तो दूर करो।फ हे प्रभू आपण माझे अवगुण मनात ठेवू नका. आपण सर्वांकडे समभावाने पाहणारे आहात! लोखंडाच्या एका तुकड्याची मूर्ती बनते तर दुसऱ्या तुकड्यापासून खाटकाचा सुरा बनतो पण परिसस्पर्श झाला की, त्या दोन्ही लोखंडाच्या तुकड्यांचे सोनेच बनते. तसंच हे देवा! आपण माझ्यातील दुर्गुणांकडे न बघता आतील माणसाकडे बघा! आर्तपणे आळवलेले हे सूरदासाचे भजन स्वामीजींच्या कानावर पडले तेव्हा त्यांचे अंत:करण हेलावले. ते स्वत:शीच म्हणाले, ङ्गतू संन्यासी आहेस ना? सगळीकडे एकच एक ब्रह्म पाहतोस ना? मग त्या नर्तकीतल्या ब्रह्माला तू असं दूर का लोटतोस? सगळीकडे असणारं ब्रह्म तिच्यातही आहे! या विचाराशी ते दरबारात धावले आणि अश्रुपूर्ण नेत्रांनी त्यांनी ते संपूर्ण भजन ऐकले. नंतर त्यांनी त्या नर्तकीला ङ्गआईफ असे संबोधून तिची क्षमा मागितली! या प्रसंगाने स्वामीजींच्या मनातील उरला सुरला भेदभावही नष्ट झाला .
कथा उपदेश : जात-पात किंवा जन्मजात, उच्चनीचता मानू नये.

## प्रगतीसाठी मत्सर नव्हे, प्रेरणेची गरज

मत्सर करणारा माणूस



प्रगती करण्याऐवजी इतरांच्या प्रगतीत अडथळे उत्पन्न करीत असतो. असा माणूस मानसिक कुरापतीमुळे स्वत: महत्त्वकांक्षी नसतोच उलट स्वत:च्या व इतरांच्या प्रगतीतील अडसर असतो. त्याची विकृत व संकुचित मानसिकता म्हणत असते कि, मी बसलो आहे तर तूही पुढे जाऊ नकोस. पुढे जाण्यासाठी, प्रगती करण्यासाठीही मत्सराची नव्हे तर प्रेरणेची गरज असते. एखाद्याला एखादी गोष्ट उत्तमरित्या करताना पाहून त्यापासून प्रेरित होणे व त्यांचे अनुकरण करणे माणसाला झुंजार व प्रगतिशील बनवते. तसेच स्पर्धे ची भावना पुढे जाण्यास मदत करते. प्रत्येक यशस्वी व्यक्तिने कोणाकडून तरी प्रेरित होऊन व त्याच्या गुणांचे अनुकरण करूनच यश संपादन केलेले असते. कोणाचा मत्सर करून नव्हे. मत्सरामुळे तर आपले भविष्य व करियर दोन्हीही नष्ट होते. म्हणूनच मत्सर जाळून प्रेरणा पाळायला, जोपासणे आवश्यक आहे.

# रिलेशनशिप मध्ये या गोष्टींच्या बाबतीत नको तडजोड



नाते पती-पत्नीचे असो, की मित्र-मैत्रिणीचे, यामध्ये समजूतदारपणा दोघांकडेही लागतो हे खरेच आहे. जर दोघेही समजूतदार असतील, तर नात्यातील अनेक तिढे सहज सुटत असतात. अनेकदा ही तिढे सोडविण्यासाठी दोघांपैकी कोणाला तरी तडजोड करावी लागत असते, माघारही घ्यावी लागत असते. त्यामुळे नात्याचा गोडवा टिकविणे शक्य होत असते. पण आपले नाते टिकवून ठेवण्यासाठी प्रयत्न करण्याच्या नादामध्ये आपण सर्वच बाबतीत तडजोड तर करीत नाही, याची काळजी घेणे देखील आवश्यक ठरत असते. जर एखादी व्यक्ती रिलेशनशिपमध्ये असेल तर ही नाते टिकवून ठेवण्याची जबाबदारी या नात्यामधील दोघांचीही असते. त्यामुळे हे नाते टिकवून ठेवताना काही गोष्टींच्या बाबतीत तडजोड केली जाऊ नये.
जर एखाद्या रिलेशनशिपची नव्याने सुरुवात होत असेल, तर या रिलेशनशिपच्या सुरुवातीलाच एकमेकांच्या प्रति ङ्गकमिटमेंटफ व्यक्त करणे हे शक्य होत नसते. पण ही रिलेशनशिप पुढे नेण्याच्या दृष्टीने किंवा टिकवून ठेवण्याच्या दृष्टीने केले जाणारे प्रयत्न दोघांच्या कडूनही केले जावेत. या बाबतीत तडजोड नसावी. रिलेशनशिप मध्ये असताना दोघांपैकी कोणी तरी एकचजण ही रिलेशनशिप टिकवून ठेवण्यासाठी हरप्रकारे तडजोड करीत



असेल, व दुसरा रिलेशनशिपच्या बाबतीत फारच सहज, म्हणजे ङ्गरिलॅक्सफ असेल, तर असे नातेसंबंध फार काळ टिकून राहणे अवघड होऊन बसते. नातेसंबंध कसेही असोत, त्यामध्ये संवाद हा हवाच. आपल्या बाबतीत काही चांगले घडले असो, किंवा काही वाईट घडले असो, त्याबाबत आपल्या जोडीदाराशी चर्चा करणे महत्वाचे आहे. तसेच या विषयी झालेली चर्चा ही खासगी असून, याबाबतीत चारचौघात उल्लेख करणे आवर्जून टाळले जावे. आपल्या व्यक्तिगत बाबी जर चारचौघात चर्चिल्या जाण्याच्या बाबतीत तडजोड करू नये.
रिलेशनशिप टिकून राहण्यासाठी व यशस्वी होण्यासाठी प्रामाणिकपणा हा सर्वात मोठा गुण आवश्यक असतो. आपल्या जोडीदाराशी प्रामाणिक असणे आणि सर्वच बाबतीत आपल्या जोडीदाराची विश्वासार्हता याबाबतीत तडजोड कधीच असू नये. तसेच आपल्या नातेसंबंधांचे चित्र स्पष्ट असावे. एकाचे आपल्या जोडीदारावर मनापासून प्रेम आणि जोडीदारासाठी मात्र दुसरी व्यक्ती केवळ त्याच्या फायद्यापुरती असे चित्र एखाद्या रिलेशनशिप मध्ये असेल, तर ही रिलेशनशिप टिकवून ठेवणे कालांतराने कठीण होऊन बसते. त्यामुळे रिलेशनशिपच्या बद्दल आपल्या मनामध्ये असलेल्या मक्लॅरिटीफ विषयीही कोणतीच तडजोड किंवा गैरसमज नसावेत.आपल्यासाठी आपला जोडीदार महत्वाचा असतो. त्यामुळे त्याच्या व्यतिरिक्त जर इतर गोष्टींना सातत्याने प्राधान्य मिळत असेल, तर नातेसंबंधांमध्ये तणाव निर्माण होणे साहजिकच असते. म्हणूनच सातत्याने जोडीदाराखेरीज इतर मित्रमंडळींना दिले जाणारे प्राधान्य हे खुपणारे असते. मित्रमंडळी, इतर कामे महत्वाची असली, तरी जोडीदारासाठी देण्याचा वेळ जर या गोष्टींमध्ये खर्च घातला, तर वाद निर्माण होणारच. त्यामुळे जोडीदारासाठी द्यायचा वेळ हा त्याच्याचसाठी असावा. त्याबाबतीत तडजोड शक्यतो करू नये.

## डॉक्टरांपासून दूर राहण्यासाठी
### डॉक्टर टीप्स



दैनंदिन आहारात कॅल्शियम, लोह यांसारखे घटक महत्त्वाचे असतात. हिमोग्लोबीन व विविध जीवनसत्त्वांची पातळी शरीरात योग्य राखली गेली, तर डॉक्टरांपासून दूर राहता येईल.दैनंदिन आहारात कॅल्शियम, लोह यांसारखे घटक महत्त्वाचे असतात. हिमोग्लोबीन व विविध जीवनसत्त्वांची पातळी शरीरात योग्य राखली गेली, तर डॉक्टरांपासून दूर राहता येईल.तुम्हाला आरोग्य चांगलं ठेवायचं असेल आणि डॉक्टरपासून दूर राहायचं असेल, तर शरीराकडे लक्ष देणं गरजेचं आहे. **कॅल्शियम, लोह गरजेचं**–शरीराला तंदुरुस्त ठेवण्यासाठी काही बाबी लक्षात घेणं गरजेचं आहे. कॅल्शियम आणि लोहाची शरीराला आवश्यकता असते. कॅल्शियम आणि लोहाच्या कमतरतेमुळे तुम्हाला चालता-फिरताना त्रास होऊ शकतो; म्हणूनच डॉक्टरही तुम्हाला या दोन्हीचं संतुलन राखण्याचा सल्ला देतात. आहारात कॅल्शियम आणि लोह यांचं प्रमाण भरपूर असेल, अशा पदार्थांचा समावेश करावा. यात मेथी, पालक, हिरव्या पालेभाज्या यांचा समावेश आहे.

## विनोद




बसंतीने लग्न ठरविले. तिचे वडील तिला म्हणाले, तू लग्न ठरवलंस याला माझा विरोध नाही पण एक विचारू?
बसंती : विचारा बाबा.
तिचे वडील : त्याच्याकडे चांगलं डबोलं वगैरे आहे ना?
बसंती : हे काय बाबा, तुम्ही सगळे पुरुष इथून तिथून सारखेच. तो देखील मला हाच प्रश्न विचारत होता. तुझ्या बापाजवळ डबोलं आहे ना?

## संदेश

Badi Shiddat se chaha tha ki uska Mobile recharge karu Mai
magar muhalle ki 2 rechage ki dukano me se 1 recharge wala
uska Bhai Nikala aur 2 uska mustanda boyfriend...

## सुविचार



हात उगारण्यासाठी नसतात उभारण्यासाठी असतात.


**– बाबा आमटे**

**संस्कृत सुभाषित**

**अरसिकेषु कवित्व निवेदनम, शिरसि लिख मा, लिख मा, लिख मा।।**

अर्थ – काव्यास्वाद घेण्यासाठी रसिकही तसेच जाणते असावे लगतात. ज्यांना त्या विषयातले काही कळत नाही, गोडी नाही, अशा ढम्म अरसिकांपुढे काव्यागायंन करण्याचा प्रसंग, हे परमेश्वरा, माझ्या नशिबात लिहू नको, असे कवी म्हणतो.

## मनोरंजक महाशब्दकोडे



### आडवे शब्द

१. दिवसाची चाकोरी (ला.)
५. तडीपार
७. बहुदा उसने बळ
९. जुगाराचा एक प्रकार
१०. अमावस्या
११. गांधीजींच्या आंदोलनाचा मार्ग
१२. गंध
१४. नजरकैद, अटक
१६. योग्य, बरोबर
१८. संताप
१९. रूक्ष, कोरडे
२२. सेवक
२३. मृत्यू नसलेला
२४. बातमी
२५. उत्तरदायित्त्व, जोखीम
२७. किरकोळ सामान
३०. भार, बोजा
३१. शेवटचा पांडव
३३. गाडीचे छत
३५. विजार
३६. वरपांगी
३८. वटवट, त्रास
३९. पदर
४१. दरवाजा
४२. आरोप
४३. सवय, उत्तर दिशा
४४. देवाण-घेवाण
४८. आस, अक्ष
४९. बडबड्या
५०. प्रेत
५२. निवासस्थान
५३. सर्वांना सारखे प्रमाण
५५. रेचक
५६. वागणूक
५७. किंमत
५८. नवीन आलेला
६०. लहानच्या विरुद्ध
६१. कोवळ्या दुधाचा पदार्थ
६२. दिवसभराचे एकूण काम
६४. यापेक्षा चांगला गोंद कुठला?
६६. भांडण
६७. मस्ती, जोम
६८. पोते शिवण्याची जाड सुई
६९. खोदकाम
७१. पोपट
७३. सैन्याचा दाणागोटा
७४. वाळवी, उणीव
७५. अनौपचारिक सहभोजन

### उभे शब्द

१. रम्य
२. बाजार
३. बंगाली रुपाया
४. घर सोडून निघून जाणे
५. मावळ्यांची युद्धातील घोषणा
६. मर्यादा
७. स्थिती, दशा
८. वस्त्र, कापड
११. मध्यम प्रमाण
१३. '--मंद झाल्या तारका, आता तरी येशील का'
१५. सह, सोबत
१७. थापा मारणारा
२०. आवाजातील घोगरेणा
२१. सज्ज
२२. मोठा भाऊ
२४. धडपड, प्रयत्न
२५. आजूबाजूला
२६. पावाचा गोल प्रकार
२८. धडक
२९. स्पष्ट, रोखठोक बोलणारा
३१. संतोष आनंद
३२. आशीर्वाद
३४. अंदाज, तर्क
३७. नवरदेव
४०. चटकन
४२. सजावट
४४. अवडंबर, धैर्य
४५. उंबरठा
४६. सचिव, मुख्य
४७. किंमत
४८. अंब्याचे मिष्टान्न
४९. चणचण, न्यूनता
५१. मुलगा किंवा मुलगी
५३. चांगली वागणूक
५४. मोबदल्याची अपेक्षा नसलेले पद, हुद्दा इ.
५५. धनको
५९. मरेपर्यंत
६०. मोजणी
६१. हास्याचे पीक
६३. सुसर
६४. उत्सव
६५. फुलातील पुंकेसर
७०. पुरुष
७२. वैताग (ला.)

### आडवे उत्तर

१.रहाटगाडगे ५.हद्दपार ७.अवसान ९.मटका १०.अवस ११.सत्याग्रह १२.वास १४.स्थानबद्ध १६.यथार्थ १८.राग १९.रखरखीत २२.दास २३.अमर २४.रबर २५.जबाबदारी २७.सटरफटर ३०.वजन ३१.सहदेव ३३.टप ३५.पायजमा ३६.वरवर ३८.कटकट ३९.पालव ४१.दार ४२.आळ ४३.सव ४४.आदानप्रदान ४८.आरा ४९.वाचाळ ५०.कलेवर ५२.धाम ५३.समसमान ५५.सारक ५६.वर्तन ५७.दर ५८.नवागत ६०.मोठा ६१.खरवस ६२.कामकाज ६४.सरस ६६.कलह ६७.रग ६८.दाभण ६९.खनन ७१.रावा ७३.रसद ७४.कसर ७५.अंगतपंगत

### उभे उत्तर

१.रमणीय २.हाट ३.टका ४.गेहत्याग ५.हरहर महादेव ६.पारावार ७.अवस्था ८.वसन ११.सरासरी १३.सखी १५.बोरबर १७.थापेबाज २०.खर २१.तत्पर २२.दादा २४.खटपट २५.जवळपास २६.बनपाव २८.टक्कर २९.फटकळ ३१.समाधान ३२.वरदान ३४.अटकळ ३७.वर ४०.लवकर ४२.आरास ४४.आव ४५.दारवठा ४६.प्रधान ४७.दाम ४८.आमरस ४९.वानवा ५१.लेक ५३.सदवर्तन ५४.मानद ५५.सावकार ५९.ताहहयात ६०.मोजदाद ६१.खसखस ६३.मगर ६४.सण ६५.पराग ७०.नर ७२.वात



# क्रीडा विश्व



## थोडक्यात/ संक्षिप्त

### टी-२० मधल्या नंबर वन बॉलरला डच्चू, सूर्याचा धक्कादायक निर्णय

दुबई-आशिया कप २०२५ मध्ये टीम इंडियाच्या मोहिमेला सुरूवात होत आहे. सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वात खेळणाऱ्या भारतीय टीमचा सामना यजमान युएईविरुद्ध होत आहे. दुबई आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर हा सामना खेळवला जात आहे. या सामन्यात टीम इंडियाचा कर्णधार सूर्यकुमार यादवने टॉस जिंकून बॉलिंगचा निर्णय घेतला आहे. या सामन्यात टीम इंडियाने संजू सॅमसन आणि शुभमन गिल या दोघांनाही संधी दिली आहे, पण आश्चर्यकारकरित्या आयसीसी टी-२० क्रमवारीमध्ये पहिल्या क्रमांकावर असलेल्या अर्शदीप सिंगला बाहेर ठेवण्यात आलं आहे. अक्षर पटेल, वरुण चक्रवर्ती आणि कुलदीप यादव या तीन स्पिनरसह टीम इंडिया खेळणार आहे.

आशिया कपसाठी शुभमन गिलचं टीम इंडियामध्ये पुनरागमन झालं, याचसोबत गिलला टीमचं उपकर्णधारही बनवण्यात आलं. गिलच्या कमबॅकमुळे ओपनिंगला कोण बॅटिंग करणार याबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित झालं होतं, कारण मागचं वर्षभर संजू सॅमसन आणि अभिषेक शर्मा यांनी टी-२० मध्ये भारतासाठी ओपनिंग केली होती आणि त्यांचं रेकॉर्डही उत्कृष्ट होतं, त्यामुळे कॅप्टन सूर्यकुमार यादव आणि प्रशिक्षक गौतम गंभीर यांची डोकेदुखी वाढली होती. आशिया कपमध्ये टीम इंडिया ग्रुप ए मध्ये आहे. या ग्रुपमध्ये भारतासोबत युएई, पाकिस्तान आणि ओमानच्या टीम आहेत. ग्रुप स्टेजमध्ये ३ पैकी २ मॅच जिंकणारी टीम सुपर-४ मध्ये प्रवेश करणार आहे. युएईविरुद्धच्या सामन्यात दणदणीत विजय मिळवून आशिया कपची दणक्यात सुरूवात करण्याचा टीम इंडियाचा प्रयत्न असेल.

टीम इंडियाची प्लेयिंग इलेव्हन

अभिषेक शर्मा, शुभमन गिल, सूर्यकुमार यादव, तिलक वर्मा, संजू सॅमसन, शिवम दुबे, हार्दिक पांड्या, अक्षर पटेल, कुलदीप यादव, जसप्रीत बुमराह, वरुण चक्रवर्ती

***

### अवघ्या ५७ धावांवर आटोपला यूएईचा डाव, कुलदीपचा विकेटचा चौकार

दुबई,-आशिया कप २०२५मध्ये टीम इंडियाचा आज पहिला सामना यूएईशी होत आहे. या सामन्यात यूएईने पहिल्यांदा गोलंदाजी करताना अवघ्या ५७ धावाच केल्या. ५७ धावांतच त्यांचे १० गडी बाद झाले. कुलदीप यादवने चार बळी घेतले तर शिवम दुबेने तीन विकेट घेतल्या.

आजचा हा सामना दुबईच्या दुबई आंतरराष्ट्रीय स्टेडियममध्ये खेळवला जात आहे. सामन्यात टॉस जिंकत भारताने पहिल्यांदा गोलंदाजीचा निर्णय घेतला आहे. यूएईच्या संघाने पहिल्यांदा फलंदाजी करताना १३.१ षटकांत केवळ ५७ धावा केल्या. यूएईकडून अलिशान शराफूने सर्वाधिक २२ धावा केल्या. तर त्याच्यापाठोपाठ सलामीवीर मोहम्मद वसीमने १९ धावा केल्या. भारत या सामन्यात विजयासह सुरूवात करेल. तर यूएईचा संघही भारतासारख्या मोठ्या संघाला हरवत आपली छाप सोडण्याचा प्रयत्न करेल.

***

### १० रनमध्ये ८ विकेट... दुबईमध्ये टीम इंडियाची वादळी बॉलिंग, घरच्या मैदानात युएईचा सुपडा साफ!

दुबई,१० सप्टेंबर (पीएसआय)

आशिया कपच्या पहिल्याच सामन्यात टीम इंडियाने भेदक बॉलिंग केली आहे, त्यामुळे युएईचा फुक्त ५७ रनवर ऑलआऊट झाला आहे. टीम इंडियाची टी-२० क्रिकेटमधली ही सर्वोत्तम कामगिरी आहे. एवढ्या कमी रनवर भारताने पहिल्यांदाच एका टीमला ऑलआऊट केलं आहे. ४७ रनवर युएईने त्यांची तिसरी विकेट गमावली होती, म्हणजेच १० रनमध्येच त्यांच्या शेवटच्या ८ विकेट गेल्या. भारताकडून कुलदीप यादव हा सगळ्यात यशस्वी बॉलर ठरला. कुलदीपने २.१ ओव्हरमध्ये फुक्त ७ रन देऊन ४ विकेट घेतल्या, यातल्या ३ विकेट कुलदीपने एकाच ओव्हरमध्ये मिळवल्या.

कुलदीप यादवशिवाय शिवम दुबेने ३ विकेट घेतल्या, तर बुमराह, अक्षर पटेल आणि वरुण चक्रवर्ती यांना प्रत्येकी १-१ विकेट मिळाली. या सामन्यात टीम इंडियाचा कर्णधार सूर्यकुमार यादव याने टॉस जिंकून पहिले बॉलिंगचा निर्णय घेतला होता. यानंतर आलिशान शराफू आणि मोहम्मद वसीम या दोन्ही ओपनरनी युएईला चांगली सुरूवात करून दिली. शराफूने २२ तर वसीमने १९ रन केले, पण यानंतर युएईच्या कोणत्याही बॅटरला दोन आकडी धावसंख्या गाठता आली नाही.या सामन्यामध्ये टीम इंडिया फुक्त एक स्पेशलिस्ट फुास्ट बॉलरसह मैदानात उतरली होती. टी-२० क्रमवारीत पहिल्या क्रमांकावर असणाऱ्या अर्शदीपला संधी देण्यात आली नाही. बुमराहसोबत हार्दिक पांड्या आणि शिवम दुबे यांनी फुास्ट बॉलिंगची जबाबदारी सांभाळली, तर कुलदीप यादव, वरुण चक्रवर्ती आणि अक्षर पटेल हे ३ स्पिनर मैदानात उतरले. कर्णधार सूर्यकुमार यादव आणि कोच गौतम गंभीर यांचा ३ स्पिनर घेऊन खेळण्याचा या निर्णय योग्य ठरला.भारताची प्लेयिंग इलेव्हन-

अभिषेक शर्मा, शुभमन गिल, सूर्यकुमार यादव, तिलक वर्मा, संजू सॅमसन, शिवम दुबे, हार्दिक पांड्या, अक्षर पटेल, कुलदीप यादव, जसप्रीत बुमराह, वरुण चक्रवर्ती

****

### साखरपुड्यानंतर अर्जुनचे 'लेडी लक' जोरात, कमबॅकच्या मॅचमध्येच केला धमाका

मुंबई-सचिन तेंडुलकरचा मुलगा अर्जुन तेंडुलकरने सात महिन्यांनंतर स्पर्धात्मक क्रिकेटमध्ये पुनरागमन केलं आहे. दीर्घ कालावधीनंतर मैदानावर परतलेल्या या अर्जुनने त्याच्या पहिल्याच ओव्हरच्या पहिल्याच बॉलवर विकेट घेतली. इतकेच नाही तर त्याने या सामन्यात हंगामातील पहिल्याच पाच विकेटही मिळवल्या. अलीकडेच अर्जुनचा सानिया चांडोकसोबत साखरपुडा पार पडला. अर्जुनच्या आयुष्यात आलेल्या लेडी लकमुळे क्रिकेटच्या मैदानातही त्याचं नशीब फुळाफुळल्याचं दिसून येत आहे.अर्जुन तेंडुलकर कर्नाटकातील प्रसिद्ध डॉक्टर केटी मेमोरियल स्पर्धेत गोव्याकडून खेळत आहे. अर्जुनने सोशल मीडियावर चाहत्यांसोबत हा क्षण शेअर केला. आपल्यासाठी हे पुनरागमन खूपच खास असल्याचं अर्जुन म्हणाला आहे.सानिया ही मुंबईतील प्रसिद्ध उद्योगपती रवी घई यांची नात आहे, ज्यांचे कुटुंब हॉटेल आणि फुड हॉस्पिटॅलिटी क्षेत्राशी संबंधित आहे. इंटरकॉन्टिनेंटल हॉटेल आणि ब्रुकलिन क्रीमरी या संस्था त्यांच्या मालकीच्या आहेत.

अर्जुन आणि सानिया यांचा साखरपुडा समारंभ अत्यंत खासगी

## सूर्या ब्रिगेडची विजयी सलामी, भारताने यूएईला ९ विकेटनी हरवले





दुबई: आशिया कप २०२५मध्ये टीम इंडियाने विजयी सलामी दिली आहे. पहिल्याच सामन्यात भारतीय संघाने यूएईवर दणदणीत विजय मिळवला आहे. यूएईवर भारताने ९ विकेट राखत विजय मिळवला आहे. या सामन्यात यूएईने पहिल्यांदा गोलंदाजी करताना अवघ्या ५७ धावाच केल्या. ५७ धावांतच त्यांचे १० गडी बाद झाले. कुलदीप यादवने चार बळी घेतले तर शिवम दुबेने तीन विकेट घेतल्या.

आजचा हा सामना दुबईच्या दुबई आंतरराष्ट्रीय स्टेडियममध्ये खेळवला जात आहे. सामन्यात टॉस जिंकत भारताने पहिल्यांदा गोलंदाजीचा निर्णय घेतला आहे. यूएईच्या संघाने पहिल्यांदा फलंदाजी करताना १३.१ षटकांत केवळ ५७ धावा केल्या. यूएईकडून अलिशान शराफूने सर्वाधिक २२ धावा केल्या. तर त्याच्यापाठोपाठ सलामीवीर मोहम्मद वसीमने १९ धावा केल्या. त्यानंतर भारताचे सलामीवीर ही धावसंख्या पूर्ण करण्यास पुरेसे ठरले. सलामीवीर अभिषेक शर्मानि ३० धावा ठोकल्या तर सलामीवीर शुभमन गिलने नाबाद २० धावांची खेळी केली. तिसऱ्या स्थानावर आलेल्या सूर्याने नाबाद ७ धावा केल्या. भारताचा पुढील सामना पारंपारिक प्रतिस्पर्धी पाकिस्तानशी होणार आहे. १४ सप्टेंबरला हा सामना रंगत आहे.

भारतीय संघाने आशिया चषक अभियानाची सुरुवात दणदणीत विजयाने केली. कुलदीप यादव, शिवम दुबे जोडीच्या दमदार प्रदर्शनाच्या बळावर भारतीय संघाने युएईचा डाव ५७ धावांतच गुंडाळला. अभिषेक शर्माच्या फटकेबाजीमुळे भारतीय संघाने हे लक्ष्य ४.३ षटकातच गाठलं. खणखणीत विजयासह भारतीय संघाने पाकिस्तानच्या आव्हानासाठी सज्ज असल्याचं दाखवून दिलं आहे. भारतीय संघाने संजू सॅमसनवर विश्वास ठेवत त्याला संघात कायम राखलं मात्र त्याची फलंदाजीची भूमिका बदलली आहे. शुबमन गिल आणि अभिषेक शर्मा ही मित्रांची जोडी सलामीला येईल हे पक्कं झालं आहे. अतिशय उष्ण आणि आर्द्र वातावरणात नाणेफेक जिंकून गोलंदाजीचा निर्णय योग्य ठरला.भारताचा ५ षटकांत सहज विजय

भारतीय संघाने अवघ्या ५ षटकांच्या आता ५८ धावांचं लक्ष्य गाठत मोठा विजय मिळवला. भारताने शिवम दुबे आणि कुलदीप यादवच्या गोलंदाजीच्या बळावर युएईला ५७ धावांवर सर्वबाद केलं. यानंतर फलंदाजीत अभिषेक शर्मा आणि शुबमन गिल या जोडीने वादळी सुरूवात करून दिली. यासह भारताने ४.३ षटकांतच ५८ धावांचं लक्ष्य गाठत विजय निश्चित केला.युएईचा संघ ऑलआऊट

युएईचा संघ अवघ्या ५७ धावांवर सर्वबाद झाला आहे. युएईने सुरूवात चांगली केली पण भारताच्या उत्कृष्ट गोलंदाजी आक्रमणापुढे फलंदाज अपयशी ठरले. शिवम दुबेने नववी तर कुलदीप यादवने १०वी विकेट घेतली. या सामन्यात कुलदीप यादवने सर्वाधिक ४ विकेट्स घेतले. शिवम दुबेने ३ विकेट्स घेतले. तर बुमराह, अक्षर आणि वरूण यांनी प्रत्येकी १-१ विकेट घेतली.अक्षर पटेल स्ट्राईक

अक्षर पटेलने १२व्या षटकातील दुसऱ्या चेंडूवर सिमरनजीत सिंगला पायचीत करत सातवी विकेट मिळवून दिली आहे. तर शिवम दुबेने १३व्या षटकातील पहिल्या चेंडूवर ध्रुव पराशरला पायचीत केलं.शिवम दुबेच्या खात्यात विकेट शिवम दुबेला युएईविरूद्ध सामन्यात गोलंदाजीची संधी मिळाली. शिवम दुबेने असिफ खानला कसोटी क्रिकेटप्रमाणे झेलबाद केलं. संजू सॅमसनने कमालीचा झेल टिपला आहे.बुमराह-वरूणने भारताचं विकेटचं खातं उघडलं

जसप्रीत बुमराहने पॉवरप्लेमधील चौथ्या षटकात अलीशान शरीफु याला कमालीचा यॉर्कर टाकत क्लीन बोल्ड केलं आणि भारताला पहिली विकेट मिळवून दिली आहे. शरीफु २२ धावा करत माघारी परतला. यासह युएईने २६ धावांवर पहिली विकेट गमावली. पुढच्या षटकात मिस्ट्री स्पिनर वरूण चक्रवर्तीने भारताला दुसरी विकेट मिळवून दिली आहे.युएईच्या शराफुची शानदार फटकेबाजी-भारताकडून आतापर्यंत हार्दिक पंड्या, बुमराह आणि अक्षर पटेलने गोलंदाजी केली. तिघांच्या गोलंदाजीवर सलामीवीर अलीशान शरीफुने उत्कृष्ट फलंदाजी करत १६ चेंडूत २५ धावा केल्या आहेत.युएईची प्लेईग इलेव्हन-मुहम्मद वसीम (कर्णधार), अलिशान शराफू, मुहम्मद जोहैब, राहुल चोप्रा (यष्टीरक्षक), आसिफ खान, हर्षित कौशिक, हैदर अली, ध्रुव पराशर, मुहम्मद रोहिद खान, जुनैद सिद्दिकी, सिमरनजीत सिंगभारताची प्लेईग इलेव्हन

अभिषेक शर्मा, शुबमन गिल, सूर्यकुमार यादव (कर्णधार), तिलक वर्मा, संजू सॅमसन (यष्टीरक्षक), शिवम दुबे, हार्दिक पंड्या, अक्षर पटेल, कुलदीप यादव, जसप्रीत बुमराह, वरूण चक्रवर्ती

## पृथ्वी शॉ वर आकारण्यात आला १०० रूपयांचा दंड! न्यायालयाकडून कारवाई; नेमके प्रकरण काय?

दिल्ली-भारताचा युवा स्टार फलंदाज पृथ्वी शॉ ने काही दिवसांपूर्वी मुंबई क्रिकेट असोसिएशनची साथ सोडून महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनकडून खेळण्याचा निर्णय घेतला. या संघाकडून खेळताना त्याने पहिल्याच सामन्यात दमदार शतक झळकावलं. मात्र यावेळी तो मैदानावरील कामगिरीमुळे नव्हे, तर वेगळ्याच कारणामुळे चर्चेत आला आहे. काही महिन्यांपूर्वी पृथ्वी शॉ छेडछाड प्रकरणात अडकला होता. पृथ्वी शॉ ला सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर सपना गिलच्या याचिकेवर उत्तर देण्यासाठी वारंवार संधी दिली गेली. असं असतानाही त्याने आपला जबाब नोंदवला नाही. आता सत्र न्यायालयाने त्याच्यावर कारवाई केली आहे. जाणून घ्या काय आहे संपूर्ण प्रकरण. सत्र न्यायालयाने पृथ्वी शॉ वर १०० रूपयांचा दंड आकारला आहे. सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर सपना गिलने त्याच्यावर धक्काबुक्की आणि छेडछाड करण्याचे आरोप केले होते. या प्रकरणात न्यायालयाने पृथ्वी शॉ ला अनेकदा आपली बाजू मांडण्याची संधी दिली. असं असतानाही त्याने आपला जबाब न नोंदवल्याने न्यायालयाने त्याच्यावर कारवाई करण्याचा निर्णय घेतला. १६ डिसेंबरला न्यायालयाची पुढची तारीख असणार आहे. या तारखेला हे प्रकरण नेमकं कोणत्या दिशेने जाईल याबाबत निर्णय घेतला जाणार आहे.हे प्रकरण १५ फेब्रुवारी २०२३ ला अंधेरीतील एका पबमध्ये घडलं होतं. सपना गिलने असा दावा केला आहे की, पृथ्वी शॉ ने सेल्फीसाठी नकार दिला होता. त्यानंतर तिचा मित्र शोभित ठाकूरचा मोबाईल हिसकावून फेकून दिला. जेव्हा ती या प्रकरणात मध्ये पडली. त्यावेळी तिच्यावर हल्ला केला

## दुबईची खेळपट्टी पाहून टीम इंडियाची डोकेदुखी वाढली, प्लेइंग-११ निवडीसाठी ३ मोठे पेच

दिल्ली-आज दुबईतील आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर आशिया कप २०२५ मध्ये भारत विरुद्ध यूएई असा सामना रंगणार आहे. भारताने यूएईविरुद्धचा एकमेव टी-२० सामना २०१६ साली खेळला होता, ज्यात टीम इंडियाने ९ विकेट्सने सहज विजय मिळवला होता. या पार्श्वभूमीवर सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखालील भारतीय संघासाठी हा सामना सोपा मानला जात असला, तरी खेळपट्टीवरील दाट गवत संघ व्यवस्थापनाच्या चिंतेत भर घालत आहे. पहिल्याच सामन्यात किती स्पिनर आणि किती वेगवान गोलंदाज उतरवायचे, हा मोठा पेच निर्माण झाला आहे.

दुबईत मिळाली नाही सरावाची संधी

दुबई आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमला नेहमीच गूढ पिच म्हणून ओळखले जाते. कधी फलंदाजांचा धमाका पाहायला मिळतो, तर कधी गोलंदाज सामन्यावर वर्चस्व गाजवतात. विशेष म्हणजे इथे कधी वेगवान गोलंदाजांना, तर कधी फिरकीपटूंना मदत मिळते. पण यंदा परिस्थिती अधिक गुंतागुंतीची आहे, कारण भारतीय खेळाडूंना इथे सरावाची परवानगीच मिळाली नाही. टीम इंडिया गेल्या आठवड्यापासून आयसीसी अकॅडमीमध्ये सराव करत होती. प्रत्यक्ष सामन्यापूर्वी फक्त एक दिवस आधीच खेळाडूंना पिच पाहायला मिळाले. गोलंदाजी प्रशिक्षक मॉर्ने मोर्कल यांनीही मान्य केले की पिचवर गवत आहे आणि त्यामुळे संघ निवडीचं डोकेदुखी वाढली आहे.

संजू सॅमसन की जितेश शर्मा?


आजच्या सामन्यात विकेटकीपर कोण असेल हा मोठा प्रश्न आहे. संजू सॅमसन की जितेश शर्मा? ज्याला आज संधी मिळेल, त्याच्यावर पुढील सामन्यांमध्येही जबाबदारी सोपवली जाण्याची शक्यता आहे. शुभमन गिलच्या पुनरागमनामुळे संजूला खालच्या क्रमात फलंदाजी करावी लागेल. दरम्यान, संजूच्या तुलनेत जितेशने जास्त विकेटकीपिंग सराव केला आहे, त्यामुळे संजूला बाकावर बसवले जाण्याचीही शक्यता आहे.

सर्वात मोठा पेच म्हणजे क्रमांक आठची जागा

भारतीय संघासाठी सर्वात मोठा पेच म्हणजे क्रमांक आठची जागा आहे. या स्थानासाठी शिवम दुबेचा विचार केला जातोय, जो नेट्सवर गोलंदाजीही करत आहे. जसप्रीत बुमराहसोबत अर्शदीप सिंग किंवा हर्षित राणा यांना उतरवले, तर तिसऱ्या वेगवान गोलंदाजाची भूमिका हार्दिक पांड्या आपल्या ४ षटकांतून निभावू शकतो. शिवाय, अभिषेक शर्मा याला गेल्या काही सामन्यांमध्ये सहावा गोलंदाज म्हणून आजमावलं जात आहे. मोर्कल म्हणाले, ''संघात ऑलराउंडर असल्यानं कर्णधाराला पर्याय वाढतात, म्हणूनच आम्ही सर्व कॉम्बिनेशनची टेस्ट करत आहोत.'' भारतीय संघ आजचा सामना यूएईविरुद्ध खेळताना पुढील पाकिस्तानविरुद्धच्या महत्त्वाच्या लढतीचा विचार करणार आहे. एकदा योग्य कॉम्बिनेशन ठरवल्यानंतर बदल होण्याची शक्यता कमी आहे. मोर्कल याने स्पष्ट केले, ''आम्ही सर्व पर्याय खुले ठेवले आहेत. सामना सुरू होण्याच्या दिवशी परिस्थिती पाहूनच अंतिम निर्णय घेतला जाईल. कर्णधार सूर्यकुमार यादव यांच्याकडे प्रत्येक परिस्थितीत योग्य पर्याय असावेत, हीच आमची मुख्य भूमिका आहे.''

## वर्ल्ड कपसाठी कीवींच्या संघाची घोषणा; एकही सामना न खेळलेल्या खेळाडूला संघात स्थान

नवी दिल्ली -३० सप्टेंबरपासून भारतात सुरु होणाऱ्या महिला वनडे विश्वचषकासाठी न्यूझीलंड क्रिकेट बोर्डाने आपला संघ जाहीर केला आहे. २०२४ मध्ये झालेल्या महिला टी-२० विश्वचषकात कीवी संघाने चमकदार कामगिरी केली आणि विजेतेपद पटकावले होते, तर आता त्यांचे लक्ष वनडे विश्वचषकातही तीच कामगिरी पुन्हा करण्यावर असेल. आगामी मेगा स्पर्धेत कीवी संघाचे कर्णधारपद सोफी डेव्हाईनच्या खांद्यावर असणार आहे, तर अशा काही खेळाडूंनाही संघात स्थान मिळाले आहे जे पहिल्यांदाच विश्वचषकात खेळताना दिसतील.२२ वर्षीय फ्लोरा डेव्हॉनशायरची निवड : महिला वनडे विश्वचषकासाठी जाहीर झालेल्या न्यूझीलंड संघाबद्दल बोलायचं झालं तर, २२ वर्षीय डावखुरी फिरकी गोलंदाज फ्लोरा डेव्हॉनशायरचा त्यात समावेश करण्यात आला आहे, जिनं आतापर्यंत वनडे स्वरुपात एकही सामना खेळलेला नाही. त्याच वेळी, कीवी संघाच्या टी-२० विश्वचषक विजेत्या संघाचा भाग असलेल्या फ्लोरा जोन्सची आगामी मेगा स्पर्धेत निवड न होणं हा एक मोठा निर्णय मानला जात आहे. याशिवाय, पॉली



इंग्लिस, बेला जेम्स आणि ब्री इलिंग या तीन अशा खेळाडू आहेत ज्यांना अद्याप वनडे स्वरुपात खेळण्याचा फारसा अनुभव नाही.

निवडीदरम्यान घ्यावे लागले कठोर निर्णय : कीवी महिला संघाचे मुख्य प्रशिक्षक बेन सॉयर यांनी फ्लोराची निवड न करण्याबाबतच्या त्यांच्या निवेदनात म्हटले आहे की जेव्हा तुमच्याकडे एकाच जागेसाठी अनेक खेळाडूंचा पर्याय असतो, तेव्हा तुमच्यासाठी निर्णय घेणं सोपं नसतं आणि निवडीदरम्यान आम्हाला काही कठीण निर्णय घ्यावे लागले. फ्लोरा आणि फ्रानमध्ये आम्हाला असंच काहीतरी दिसले.

महिला वनडे विश्वचषकासाठी न्यूझीलंड संघ :सोफी डेव्हाईन (कर्णधार), सुझी बेट्स, एडन कार्सन, फ्लोरा डेव्हॉनशायर, इझी गेज, मॅडी ग्रीन, ब्रुक हॉलिडे, ब्री इलिंग, पॉली इंग्लिस, बेला जेम्स, जेस केर, अमेलिया केर, रोझमेरी मायर, जॉर्जिया प्लिमर, ली ताहुहू.

पहिला सामना ऑस्ट्रेलियाविरुद्ध : आगामी महिला वनडे विश्वचषकात, न्यूझीलंड संघ आपला पहिला सामना १ ऑक्टोबर रोजी इंदूरमधील होळकर स्टेडियमवर ऑस्ट्रेलियन महिला संघाविरुद्ध खेळेल. कीवी संघ १३ सप्टेंबर रोजी यूएईला रवाना होईल जिथं ते विश्वचषकाची तयारी करतील ज्यामध्ये संघाला इंग्लंड संघाविरुद्ध २ सराव सामने खेळण्याची संधी देखील मिळेल आणि त्यानंतर ते तिथून भारतासाठी रवाना होतील.

## भारताच्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यात अचानक बदल; तिसऱ्या ओडीआय सामन्याचे ठिकाण बदलले

दिल्ली,-भारतीय महिला क्रिकेट संघाच्या २०२६ च्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यात बदल करण्यात आला आहे. या दौऱ्यात दोन्ही संघांमध्ये खेळला जाणारा तिसरा एकदिवसीय सामना आता ओव्हल, मेलबर्न येथून होबार्ट येथे हलवला जाईल. हा सामना १ मार्च २०२६ रोजी खेळवला जाणार आहे. हा ओव्हलचा पहिला दिवस-रात्र आंतरराष्ट्रीय सामना असणार होता, परंतु फ्लडलाइट बसवण्यास विलंब आणि स्टेडियममध्ये प्रेक्षकांच्या प्रवेशाशी संबंधित समस्यांमुळे तो हलवावा लागला.

क्रिकेट ऑस्ट्रेलियाने म्हटले आहे की, फ्लडलाइट बसवण्याचे काम वेळेवर पूर्ण होताना दिसत नाही. यासोबतच, मैदानाभोवती सुरू असलेल्या कामामुळे प्रेक्षकांवर परिणाम होऊ शकतो. मालिकेचे वेळापत्रक खूपच कडक असल्याने आणि दुसऱ्या आणि तिसऱ्या एकदिवसीय सामन्यात फक्त एका दिवसाचे अंतर असल्याने, सामन्याचे दिवसाच्या सामन्यात रूपांतर करणे शक्य नव्हते. त्याच वेळी, नूतनीकरणामुळे मेलबर्न क्रिकेट ग्राउंड देखील या काळात उपलब्ध राहणार नाही. क्रिकेट ऑस्ट्रेलियाचे क्रिकेट ऑपरेशन्स आणि शेड्युलिंग प्रमुख पीटर रोच म्हणाले, मजंक्शन ओव्हलवरून सामना हलवावा लागला आणि या हंगामात मेलबर्नमध्ये महिलांचा आंतरराष्ट्रीय सामना होणार नाही याबद्दल आम्हाला निराशा झाली आहे. आम्हाला आशा होती की वेळेवर लाईट बसतील आणि आम्ही येथे पहिला आंतरराष्ट्रीय रात्रीचा सामना पाहू शकू.फ होबार्टला लागोपाठ एकदिवसीय सामने मिळणार

आता होबार्टमध्ये सलग दोन एकदिवसीय सामने खेळवले जातील, जे टास्मानियन प्रेक्षकांसाठी मोठा फायदा असेल. त्याच वेळी, देशांतर्गत क्रिकेट आणि महिला बिग बॅश लीगचे सामने पूर्वीप्रमाणेच जंक्शन ओव्हलवर दिवसा खेळवले जातील.

भारताच्या ऑस्ट्रेलिया दौऱ्याच्या वेळापत्रकात बदल

भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील ही बहु-फॉर्मेट मालिका आहे, ज्यामध्ये प्रथम तीन टी-२० सामने होतील. त्यानंतर, पर्थच्या वाका मैदानावर तीन एकदिवसीय आणि शेवटी एक दिवस-रात्र कसोटी खेळवली जाईल.

यावेळी ऑस्ट्रेलियन महिला संघाचा देशांतर्गत हंगाम फेब्रुवारी आणि मार्चमध्ये होत आहे. याचे कारण म्हणजे महिला प्रीमियर लीग जानेवारीमध्ये खेळवली जाणार आहे आणि एकदिवसीय वर्ल्ड कप ऑक्टोबरमध्ये होणार आहे. यामुळे, ऑस्ट्रेलियन महिला संघ एक वर्षापेक्षा जास्त काळानंतर त्यांच्या घरच्या मैदानावर खेळणार आहे.

## दयानंद कला महाविद्यालयीन सफाई कामगार श्रीमती सुनिता चिंडाले यांची शासकीय तंत्रनिकेतनात नियुक्ती



**लातूर/प्रतिनिधी :** दयानंद शिक्षण संस्था संचलित दयानंद कला महाविद्यालय, लातूर येथे गेली तीन वर्षे विनाअनुदानित तत्त्वावर सातत्याने सफाई कामगार म्हणून कार्यरत असलेल्या श्रीमती सुनिता चिंडाले यांची नुकतीच पुरणमल लाहोटी शासकीय तंत्रनिकेतन, लातूर येथे वारसा पद्धतीने सफाई कामगार म्हणून नियुक्ती करण्यात आली.

या नियुक्ती निमित्त दयानंद कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांनी त्यांचा सत्कार करून त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी डॉ. संतोष पाटील, माधव सूर्यवंशी, नवनाथ भालेराव, प्रा.अंगद भुरे, प्रा.स्नेहा वाघमारे, प्रा.धायगुडे, प्रा.कोरे, रोहिणी सांडूर, आदमाणे,निर्मला धहिरे व सर्व कर्मचारी वर्ग उपस्थित होते.

## विश्वविख्यात अध्यात्मिक गुरु श्री श्री रविशंकर यांचा डॉ. राहुल विश्वनाथ कराड यांनी केला सन्मान



**लातूर/प्रतिनिधी :** विश्वविख्यात अध्यात्मिक गुरू श्री श्री रविशंकर यांचा लातूर येथे माईर्स एमआयटी शिक्षण संस्था समूह, पुणेचे व्यवस्थापकीय विश्वस्त व कार्यकारी अध्यक्ष डॉ. राहुल विश्वनाथ कराड यांनी वारकरी संप्रदात महत्व असलेल्या विणा आणि पगडी घालून त्यांचा सन्मान केला. तसेच दौंड येथे नव्याने सुरू करण्यात आलेल्या 'लाइफ ट्रान्सफॉर्मेशन सेंटर' च्या उद्घाटंन समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहण्याचे निमंत्रण देण्यात आले. यावेळी श्री श्री रविशंकर म्हणाले,'' अध्यात्म आणि विज्ञानाच्या समन्वयातून या संस्थेतर्फे विद्यार्थ्यांना दिले जाणारे शिक्षण हे उच्च कोटीचे आहे. यामुळे भविष्यात हे विद्यार्थी विश्वाशांती व दिशा दर्शक असतील. तसेच लोकशाही सक्षमीकरण्यासाठी डॉ. राहुल कराड हे युवकांमध्ये बिजे रुजविण्याचे महान कार्य करीत आहेत. राष्ट्रीय विधायक संमेलन, भारतीय छात्र संसद, सरपंच संसद, महिला संसद आणि नुकतेच महाराष्ट्र वारकरी किर्तनकार परिषदेचे आयोजन करून देश घडविण्याचे कार्य करीत आहेत. त्यांचे कार्य अभिनंदनीय आहे. त्यांच्या या कार्यातून देशाला उत्कृष्ट व चांगले नेतृत्व करणारी युवा पिढी मिळत आहे.'' डॉ. राहुल कराड म्हणाले,'' भक्ती, संगीत आणि ज्ञान या त्रिवेणीच्या माध्यमातून समाजाला योग्य दिशा दाखविण्याचे कार्य आर्ट ऑफ लिव्हिंगच्या माध्यमातून गुरूजी करीत आहेत. त्यांनी लातूर जिल्ह्यातील काही खेडे दत्तक घेऊन पाण्यासारखे ज्वलंत प्रश्न सोडविण्याचा बिडा उचलला आहे. त्यांनी अध्यात्माबरोबर सामाजिक कार्य करुन मणुष्याचे जीवन उंचविण्याचे बहुमूल्य कार्य करीत आहे.''

# महाराष्ट्र जन सुरक्षा कायद्याविरोधात लातुरात महाविकास आघाडीचे निदर्शने, सरकारविरोधात रोष व्यक्त

### – राज्यभरातून महाविकास अघाडीकडून कायद्याला तीव्र विरोध
### – महाराष्ट्र जन सुरक्षा कायदा व सरकार विरोधात घोषणाबाजी

**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र जन सुरक्षा कायद्याच्या विरोधात महाविकास आघाडीच्या वतीने दि.१० सप्टेंबर (बुधवार) रोजी लातुर शहरातील महात्मा गांधी चौक या ठिकाणी तीव्र निदर्शने करीत या जुलमी कायद्याला तीव्र विरोध करण्यात आला. शहरातील महात्मा गांधी चौकात झालेल्या या आंदोलनात काँग्रेस,राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार), काँग्रेस आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) या महाविकास आघाडीतील तिन्ही पक्षांचे नेते,सामाजिक कार्यकर्ते,पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कायद्यावर गंभीर आक्षेप

महाविकास आघाडीच्या नेत्यांनी हा कायदा म्हणजे ''काळा कायदा'' असून तो लोकशाहीच्या विरोधात असल्याचे म्हटले आहे.या कायद्यामुळे पोलिसांना अमर्याद अधिकार मिळतील आणि त्याचा गैरवापर राजकीय विरोधकांना दडपण्यासाठी केला जाईल, अशी भीती यावेळी व्यक्त करण्यात असून यावर गंभीर आक्षेप घेत आंदोलकांनी ''हे सरकार निर्लज्ज आणि मस्तवाल'' असल्याचा आरोप करत जोरदार घोषणाबाजी केली.





भगत सिंग होण्याची वेळ आली आहे

यावेळी बोलताना, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अभय साळुंके म्हणाले की, या कायद्याची तुलना इंग्रजांच्या ''पब्लिक सिक्युरिटी ॲक्ट''शी करावी लागेल. इंग्रजांनी याच कायद्याविरोधात आवाज उठवणाऱ्यांना तुरुंगात टाकले होते,आणि तेव्हा भगत सिंग यांनी संसदेत बॉम्ब टाकून त्याचा निषेध केला होता.आज पुन्हा एकदा स्वतंत्र भारतात भगतसिंग होण्याची वेळ आली आहे,असे ते म्हणत या कायद्याला प्रत्येक देशभक्त नागरिकाने विरोध करणे आवश्यक आहे,असेही आवाहन त्यांनी केले.

लोकशाहीचा गळा दाबणारा कायदा

या आंदोलनात सहभागी झालेले विचारवंत प्रा.डॉ. सोमनाथ रोडे यांनी हा कायदा म्हणजे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या संविधानातील मूळ सिद्धांतावर घाला घालणारा प्रकार असून हा कायदा लोकशाहीचा गळा दाबनारा कायदा आहे असे मत व्यक्त केले. तसेच ज्याप्रमाणे जनतेने शेतकरी विरोधी काळे कायदे रद्द करायला सरकारला भाग पाडले तसाच जनरेटा या कायद्याच्या विरोधात तयार झाला पाहिजे आणि हे कायदे रद्द झाले पाहिजेत असेही ते म्हणाले.

चळवळीचा पाया कमकुवत करण्यासाठी हा जन सुरक्षा कायदा आणला आहे

ज्येष्ठ पत्रकार जयप्रकाश दगडे देखील या आंदोलनामध्ये सामील झाले होते. त्यांनी यावेळी माध्यमांशी बोलताना चळवळीचा पाया कमकुवत करण्यासाठी हा जन सुरक्षा कायदा आणला आहे असे सांगून याचा सर्व स्तरातून निषेध व्हावा व हा कायदा लवकरात लवकर रद्द व्हावा अशी मागणी केली.

दरम्यान यावेळी महाराष्ट्र जन सुरक्षा कायद्याच्या प्रतीची होळी महाविकास आघाडीच्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांकडून करण्यात आली.

यावेळी शेतकरी कामगार पक्षाचे नेते ॲड. उदय गवारे,राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष राजा मणियार,शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाध्यक्ष संतोष सोमवंशी,बालाजी रेड्डी, महानगर प्रमुख सुनील बसपुरे, लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष ॲड. किरण जाधव काँग्रेसचे प्रदेश सचिव ॲड. समद पटेल, अशोक गोविंदपुरकर, सुनिता चाळक,मनिषा कोकणे,कल्पना फरकांडे, सुलेखा कारेपूरकर, करुणा शिंदे, कल्पना मोरे,शीतल मोरे यांच्यासह महाविकास आघाडीतील घटक पक्षाचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## दयानंद विज्ञानमध्ये थॉमस डी.ब्रॉक यांची जयंती साजरी

**लातूर/प्रतिनिधी :** येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयात दि.१० सप्टेंबर २०२५ रोजी ख्यातनाम अमेरिकन सूक्ष्मजंतुविज्ञानी थॉमस डी.ब्रॉक यांच्या जयंतीनिमित्त विशेष कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला.कार्यक्रमाची सुरुवात बायोटेक्नॉलॉजी विभागाच्या प्रमुख प्रा.अवंती बिडकर यांनी थॉमस डी.ब्रॉक यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून केली.त्यानंतर एम.एस्सी. द्वितीय वर्षातील विद्यार्थी प्रकाश गवळी याने थॉमस डी.ब्रॉक यांच्या जीवनप्रवास आणि संशोधन योगदानाचा आढावा सादर केला.

थॉमस डी.ब्रॉक हे १९२६ मध्ये जन्मलेले अमेरिकन सूक्ष्मजंतुविज्ञानी होते.त्यांनी थर्मस ॲक्वॅटिकस हा यलोस्टोन



नॅशनल पार्कमधील गरम पाण्याच्या झऱ्यांमध्ये आढळणारा उष्णप्रेमी जीवाणू शोधून काढला.या जीवाणूमधून मिळालेल्या ताक पॉलिमरेज या ऊष्णतास्थिर एन्झाइमच्या शोधामुळे आधुनिक जीवशास्त्रात क्रांती घडली.या एन्झाइमच्या मदतीने पीसीआर ही तंत्र विकसित झाली.पीसीआर तंत्रज्ञानामुळे जनुकशास्त्र,वैद्यक,फॉरेन्सिक विज्ञान,कृषी संशोधन आणि जैवतंत्रज्ञान या क्षेत्रांत नवे दालन खुले झाले. डीएनए विश्लेषण,रोगनिदान,औषध संशोधन,गुन्हे अन्वेषण यासारख्या अनेक क्षेत्रांत पीसीआरचा वापर होत असून त्यामागे ब्रॉक यांच्या शोधाचे मोलाचे योगदान आहे.या कार्यक्रमास प्रा.ऋतुजा डिग्रसकर,प्रा.अनुराधा शिंदे,प्रा.तृप्ती सोनकांबळे,प्रा.आऊ येळीकर यांच्यासह विभागातील इतर प्राध्यापक,शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच पदवी व पदव्युत्तर विद्यार्थी उपस्थित होते.कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना ब्रॉक यांच्या संशोधनातून विज्ञानातील चिकाटी,जिज्ञासा आणि नवकल्पनाशक्तीचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.

# शासकीय वसतिगृहाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सुख सुविधा उपलब्ध होणार – सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील

**चाकूर/प्रतिनिधी :** तालुक्यातील हणमंतवाडी येथे उभारण्यात येणाऱ्या शासकीय वसतीगृहाच्या माध्यमातून सर्वसामान्य विद्यार्थ्यांना सुख सुविधा उपलब्ध होणार असल्याचे प्रतीपादन राज्याचे सहकार मंत्री तथा गोंदिया जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांनी चाकूर येथे केले.

ते चाकूर तालुक्यातील हनमंतवाडी येथे मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या निवासासाठी उभारण्यात येणाऱ्या मुलामुलींसाठीच्या दोन शासकीय वसतीगृहाच्या ३० कोटी रुपयांच्या भूमिपूजनाप्रसंगी सहकार मंत्री नामदार पाटील बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष शिवाजीराव काळे होते.

व्यासपीठावर जिल्हा नियोजन समितीचे सदस्य पद्माकरराव पाटील, चाकूरचे नगराध्यक्ष करीम गुळवे, शिवसेना जिल्हाप्रमुख गोपाळ माने, कार्यकारी अभियंता श्रीमती अलका डाके , शिवानंद हेंगणे, किशन रेड्डी, उपनगराध्यक्ष साईप्रसाद हिप्पाळे, नगरसेवक मिलिंद महालिंगे, नगरसेवक विलासराव पाटील, भाजप तालुकाध्यक्ष सिद्धेश्वर पवार, माजी जिल्हा परिषद सदस्य सुदर्शन मुंडे, जिल्हा उपाध्यक्ष बालाजी सूर्यवंशी,बाजार समितीचे संचालक यशवंत जाधव,राहुल सुरवसे, गोविंदराव भोरे, तालुका कार्याध्यक्ष भानुदासराव पोटे, तालुका कार्याध्यक्ष निसार देशमुख, बांधकाम सभापती मुजम्मिल सय्यद, नगरसेवक भागवत फुले, माजी नगरसेवक इलियास सय्यद, शिवदर्शन स्वामी, नगरसेवक नितीन रेड्डी, महंमद सय्यद, राम कसबे, संजय पाटील, पपन कांबळे, नरसिंग गोलावार, माजी उपसरपंच मुर्तुजा सय्यद, जिल्हा सरचिटणीस अर्जुन मद्रेवार, युवक राष्ट्रवादी काँग्रेस तालुका अध्यक्ष संदीप शेटे, तालुका उपाध्यक्ष गणपतराव कवठे, तालुका उपाध्यक्ष गणपतराव नितळे, तालुका उपाध्यक्ष सिद्धेश्वर आप्पा लोहारे, तालुका उपाध्यक्ष सिद्धेश्वर आप्पा अंकलकोटे,सामाजिक न्याय विभागाचे जिल्हा कार्याध्यक्ष विष्णू तिकटे, तालुकाध्यक्ष विश्वनाथ एडके, शिवशंकर हाळे, तालुका कार्याध्यक्ष विवेक शिंदे, तालुका उपाध्यक्ष परमेश्वर नवगण, ज्येष्ठ नेते अशोकराव पाटील, मच्छिंद्र नागरगोजे, निलेश भंडे, अंतेश्वर पाटील, भागवत कुसंगे, महेश व्हते, बाबूभाई दापकेवाले, समाधान डोंगरे, मन्मथ पालापुरे, बिलाल पठाण, प्रदीप पाटील गोळेगावकर, मनोज पाटील, युवराज हाके,आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना नामदार पाटील म्हणाले की, चाकूर येथे



मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी शासकीय वसतीगृह व्हावे ही जन माणसांची भावना होती. २००९ ला मी पहिल्यांदा आमदार झाल्यानंतर या वसतीगृहासाठी मी प्रयत्न केलं होतं परंतु अनेक तांत्रिक अडचणी यामध्ये येत होत्या. परंतु हनमंतवाडी येथे जागा उपलब्ध झाल्यानंतर या शासकीय वसतीगृहाचा भूमिपूजन सोहळा आज आपल्या सर्वांच्या साक्षीने संपन्न होतोय. तालुक्यात विकास कामे होत असताना जनतेचा लोकसहभाग हा महत्त्वाचा आहे. या वस्तीगृहाचे काम दर्जेदारच होणार असून यात कुठलीही शंका नाही. आपले महायुती सरकार सर्वसामान्य न्याय देण्याचा प्रयत्न करत आहे असे ना. पाटील म्हणाले

त्याचबरोबर भौतिक सुविधा बरोबर शिक्षण महत्त्वाचे असून,शिक्षणामुळे देशाची प्रगती होऊ शकते समाजाची नाडी ओळखणारे शिक्षण घेतले पाहिजे. मतदारसंघात रोजगाराच्या संधी उपलब्ध उपलब्ध करून देण्याचा आमचा प्रामाणिकपणे प्रयत्न असून, चाकूर तालुक्यात भविष्यात दूध डेरी आणणार असून दुधाच्या माध्यमातून शेतकऱ्यांची आर्थिक क्रांती करण्याचा प्रयत्न करणार असल्याचे नामदार पाटील म्हणाले. पाण्याच्या प्रश्नाबाबत सुद्धा अधिक आम्ही सतर्क असून प्रस्तुत भविष्यात चाकूर तालुक्याच्या जलजीवन मिशनच्या माध्यमातून पाणी पोहोचण्याचा आमचा प्रयत्न आहे . चाकूर तालुक्यातील अनेक पाणंद रस्त्यासाठी आम्ही प्रयत्नशील असून सर्वसामान्य माणूस हा विकासाचा केंद्रबिंदू मानून आम्ही विकास करण्याचा प्रयत्न करत आहोत.

चाकूर तालुक्यातील भविष्यातील विविध विकास कामे मार्गी लावून चाकूर तालुक्यात विकासाचा पॅटर्न निर्माण करण्याचा मी प्रयत्न करणार असल्याचे सुद्धा सहकार मंत्री ना. पाटील म्हणाले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यकारी अभियंता अलका डाके यांनी केले.

यावेळी नगरसेवक मिलिंद महालिंगे, शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख गोपाळ माने, भाजपचे तालुकाध्यक्ष सिद्धेश्वर पवार, नगरसेवक विलासराव पाटील चाकूरकर यांनी समयोचित मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार बिलाल पठाण यांनी केले.

कार्यक्रमास चाकूर तालुक्यातील विविध नागरिकांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

या कार्यक्रमासाठी सरपंच हणमंत नरवटे, उपसरपंच राजकुमार शेटे यांच्यासह मनोज नरवटे, निवृत्ती नरवटे, प्रभाकर नरवटे, परमेश्वर पाटील, शंकर पाटील, माधव नरवटे, रमाकांत नरवटे, मारुती नरवटे, लक्ष्मण चव्हाण, दिगंबर किसवे, बजरंग नरवटे, संग्राम नरवटे, नामदेव नरवटे, समाधान जाधव, अण्णाराव नरवटे, लक्ष्मण जाधव, मुक्केवार राठोड, संदीप गुळवे, नागेश नरवटे, मारुती हावळे, जेतालाल जाधव, गोविंद जाधव, तुकाराम नरवटे, ईश्वर गुळवे यांनी परिश्रम घेतले.

## दसरा आणि दिवाळी– २०२५ सणाच्या दरम्यान रेल्वे, सोलापूर–अजमेर विशेष गाड्यांच्या अतिरिक्त १२ फेऱ्या सुरू ठेवणार

**सोलापूर/प्रतिनिधी :** दसरा आणि दिवाळी– २०२५ सणाच्या दरम्यान प्रवाशांची अतिरिक्त गर्दी कमी करण्यासाठी रेल्वे सोलापूर आणि अजमेर दरम्यान धावणाऱ्या विशेष गाड्यांच्या अतिरिक्त १२ फेऱ्या सुरू ठेवणार आहे. खाली दिलेल्या तपशीलांनुसार:

सोलापूर–अजमेर साप्ताहिक विशेष (१२ फेऱ्या)

– ट्रेन क्रमांक ०९६२७ अजमेर–सोलापूर साप्ताहिक विशेष २४.०९.२०२५ पर्यंत धावण्यासाठी अधिसूचित करण्यात आली आहे, ती आता दर बुधवारी ०१.१०.२०२५ ते ०५.११.२०२५ पर्यंत धावणार आहे. (६ फेऱ्या)

– ट्रेन क्रमांक ०९६२८ सोलापूर–अजमेर साप्ताहिक विशेष २५.०९.२०२५ पर्यंत धावण्यासाठी अधिसूचित करण्यात आली आहे, ती आता दर गुरुवारी ०२.१०.२०२५ ते ०६.११.२०२५ पर्यंत धावणार आहे. (६ फेऱ्या)



वरील गाड्यांच्या संरचनेत कोणताही बदल होणार नाही.

**आरक्षण आणि बुकिंग:**

विशेष शुल्कासह विशेष गाड्यांचे आरक्षण १२.०९.२०२५ रोजी सर्व संगणकीकृत आरक्षण केंद्रांवर आणि www.irctc.co.in वेबसाइटवर सुरू होईल.

अनारक्षित डब्यांचे बुकिंग स्थानकांवर बुकिंग काउंटर आणि UTS APP द्वारे देखील करता येईल. प्रवाशांना गैरसोय टाळण्यासाठी वैध तिकिटांसह प्रवास करण्याची विनंती करण्यात आली आहे.

या विशेष गाड्यांच्या थांब्यांच्या तपशीलवार वेळेसाठी, कृपया www.enquiry.indianrail.gov.in ला भेट द्या किंवा NTES ॲप डाउनलोड करा.



# सचिन मुळेला धोबीपछाड डावावर चीतपट करत अक्षय शेळकेने पटकावली 'स्वराज्य केसरी' किताबाची गदा



लोहारा(प्रतिनिधी)- कानेगावात स्वराज्य केसरीसाठी झालेल्या कुस्तीत सचिन मुळेला ढोबीपछाड डावावर चितपट करत अक्षय शेळके २० मिनिटे झुंज देत याने चांदी गदा अन् रोख ११ हजार रुपयांसह स्वराज्य केसरी किताब पटकावला.

कानेगाव येथे श्री संत शिरोमणी मारुती महाराज कानेगावकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त स्वराज्य संस्था कानेगाव यांच्या वतीने स्वराज्य केसरी कुस्ती स्पर्धा घेण्यात आली. यात शेवटच्या कुस्तीत अक्षयने बाजी मारली. कानेगावमधील स्वराज्य संस्थेच्या वतीने सोमवारी (दि. ८) सायंकाळी ही कुस्ती स्पर्धा घेण्यात आली. स्पर्धेत धाराशिवसह लातूर, बीड, सोलापूर जिल्ह्यातील तसेच कर्नाटक राज्यातील जवळपास १२० पैलवानांनी सहभाग घेतला. लोहाऱ्याचे पोलिस निरीक्षक ज्ञानेश्वर कुकलारे यांच्या प्रमुख उपस्थितीत ही स्पर्धा पार पडली. या स्पर्धेसाठी निवृत्ती कदम, नागनाथ कदम, प्रदीप मडुळे, किशोर साबळे, विकी सूर्यवंशी यांनी परिश्रम घेतले.

तुकारामने जिंकले चांदीचे कडे स्पर्धेत दुसऱ्या बक्षिसासाठी सदगुरू कुस्ती संकुलाच्या तुकाराम सोनटक्के व अभिषेक जाधवर यांच्यात प्रेक्षणीय कुस्ती झाली. यात तुकाराम सोनटक्के याने निकाल डावावर अभिषेकला आसमान दाखवले. तुकारामने ११ तोळे चांदीचे कडे व पाच हजार रुपये रोख रकमेचे बक्षीस पटकावले.

या स्पर्धेतील पंच या स्पर्धेसाठी पंच म्हणून रामेश्वर कार्ले, दयानंद साळुंके, शशिकांत मेलगर, संजय पारवे, राजाभाऊ शेळके, माणिक कदम, बळी करंडे, संचित घोगरे, गोविंद घारगे, हरी वाघे यांनी काम पाहिले.

# उत्तम शिक्षणामुळे विद्यार्थी समृद्ध बनतात - डॉ. आडसूळ



कळंब (प्रतिनिधी)- शालेय जीवनात विद्यार्थ्यांना उत्तम दर्जाचे शिक्षण आणि पोषक वातावरण मिळाल्यास ते अधिक समृद्ध बनतात. यासाठी समाजातील जाणकार व्यक्तींनी पुढे येऊन शाळांचा विकास करण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन प्रसिद्ध वैद्यकीय व्यावसायिक डॉ. सुशील आडसूळ यांनी केले.

कळंब तालुक्यातील डिकसळ येथील श्री संत बोधले महाराज प्राथमिक विद्यामंदिर शाळेत, स्व. रामलिंग सिताराम सदाफुले (गुरुजी) यांच्या स्मरणार्थ आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. सदाफुले गुरुजींचे सुपुत्र विशाल सदाफुले यांनी वडिलांच्या स्मृती जपण्यासाठी शाळेला डिजिटल तक्ते भेट दिले.

डॉ. आडसूळ पुढे म्हणाले, स्वर्गीय सदाफुले सरांनी आपले संपूर्ण आयुष्य विद्यार्थी घडविण्यात समर्पित केले. आज त्यांचा मुलगा विशाल हेच पवित्र कार्य पुढे नेत आहे, ही अत्यंत कौतुकास्पद बाब आहे. शिक्षणाने माणसाचा कायापालट होतो, त्याचप्रमाणे ज्ञानदान करणाऱ्या शाळांचा कायापालट झाला तर शिक्षणाला एक नवा आयाम मिळेल. आपल्या पूर्वजांच्या स्मृती खऱ्या अर्थाने जागृत ठेवायच्या असतील, तर अशा समाजोपयोगी कामांची आज नितांत गरज आहे.

या कार्यक्रमावेळी कळंब मेडिकल असोसिएशनचे माजी अध्यक्ष प्रमोद पोते, डॉ. सुशील आडसूळ, विशाल सदाफुले, मुख्याध्यापक निकम पोपट, सहशिक्षक प्रदीप यादव, किशोर वाघमारे, सज्जन बर्डे, रमेश अंबिरकर, नामदेव झाडे, सूरज राऊत यांच्यासह शाळेतील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**चौदा वर्षांपासून अविरत ज्ञानयज्ञ**

विशाल सदाफुले हे गेल्या चौदा वर्षांपासून आपल्या वडिलांच्या आठवणी जागृत ठेवण्यासाठी परिसरातील शाळांना विविध प्रकारचे शैक्षणिक साहित्य भेट देत आहेत. वडिलांच्या स्मृतींना उजाळा देण्याच्या त्यांच्या या अनोख्या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

**डिजिटल तक्त्यांमुळे ज्ञानात भर**

शाळेला भेट देण्यात आलेल्या या डिजिटल तक्त्यांवर भूमितीय आकृत्या, मराठी आणि इंग्रजी व्याकरणाचे नियम, थोर भारतीय शास्त्रज्ञांची माहिती, तसेच विविध प्रकारचे नकाशे यांची सचित्र माहिती देण्यात आली आहे. या शैक्षणिक साहित्यामुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात मोलाची भर पडणार आहे.


## कार्यालय
## जिल्हा वक्फ अधिकारी, धाराशिव

मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, दुसरा मजला, हॉल क्र ९२ (सेंट्रर बिल्डींग), धाराशिव

संचिका क्र. OSD-६९/९३/२०२५ क्र. वक्फ-जिवअ/चौकशी-/७१०/२०२५.
दिनांक :- 09 SEP 2025

**(जाहीर प्रगटन)**

**उम्मीद अधिनियम १९९५ च्या कलम ६९ अन्वये वक्फ संस्थेच्या योग्य प्रशासनाकरीता योजना मंजूर करणेबाबत..**

**वक्फ संस्थेच नाव व पत्ता: दर्गाह मलीक साहेब, मस्जिद (खुली जागा) व कब्रस्थान मौज. आलेश्वर ता.परंडा जि.धाराशिव.**

उपरोक्त वक्फ संस्था महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळात नोंदणीकृत असुन अर्जदार श्री. शरीफ हनीफ मुलाणी व ईतर यांनी दिनांक. ०९/१०/२०२४ रोजीच्या अर्जान्वये सदर संस्थेच्या व्यवस्थापनाकरीता महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळा/जिल्हा वक्फ अधिकारी, धाराशिव कडे प्रारुप योजना दाखल केलेली आहे. प्रारुप योजनेतील तरतूदीनुसार विश्वस्तांचा कार्यकाळ अजीवन वर्षांचा असून व्यवस्थापन समिती निवडीची रित उर्वरित विश्वस्त नविन विशवस्तांची नेमणुक करतील अशी आहे. योजनमध्ये नमूद प्रस्तावित व्यवस्थापन समिती खालीलप्रमाणे आहे:-

| अ.क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| १. | शरीफ हनीफ मुलाणी | अध्यक्ष |
| २. | राजु सलीम शेख | उपाध्यक्ष |
| ३. | रफीक बाबामियाँ मुलाणी | सचिव |
| ४. | सोहेल सादीक मुलाणी | उपसचिव |
| ५. | शहारूख फारूख मुलाणी | खजिनदार |
| ६. | आकील शकील मुलाणी | सदस्य |
| ७. | जावेद बाशामियाँ मुलाणी | सदस्य |
| ८. | राजु मुबारक मुलाणी | सदस्य |
| ९. | मासुम दाऊद मुलाणी | सदस्य |
| १०. | कलींदर सिलीमन मुलाणी | सदस्य |
| ११. | जहाँगीर उस्मान मुलाणी | सदस्य |

सदर प्रारुप योजनेबाबत काही तक्रारी, आक्षेप असल्यास संबंधितांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ८ दिवसाच्या आत, जिल्हा वक्फ अधिकारी, कार्यालय मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, दुसरा मजला, हॉल क्र ९२ (सेंट्रर बिन्डींग) धाराशिव येथे आपले म्हणणे दाखल करावे. विहीत वेळेनंतर आक्षेप प्राप्त झाल्यास त्याची दखल घेण्यात येणार नाही. याची दक्षता घ्यावी.

स्वाक्षरीत/-
**(सय्यद आमेर)**
**जिल्हा वक्फ अधिकारी, धाराशिव**


# कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्प रामदारा ते एकुरका कामासही शासनाची मंजुरी
## सात हजार हेक्टर क्षेत्र येणार ओलिताखाली : आमदार राणाजगजितसिंह पाटील



धाराशिव (रामेश्वर डोंगरे)- कृष्णा-मराठवाडा सिंचन प्रकल्पाच्या योजना क्रमांक दोनमधील टप्पा क्रमांक १ ते ५ चे काम पूर्ण होत आले आहे. आता रामदारा ते एकुरका या टप्पा क्रमांक ६ च्या कामासही शासनाने मंजुरी दिली आहे. जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी आपल्या मागणीवरून प्राधान्यक्रमात टप्पा क्रमांक ६ चा समावेश केला आहे. त्यामुळे तुळजापूर, उमरगा आणि लोहारा या तीन तालुक्यात पाणी वितरणाची व्यवस्था निर्माण झाल्यावर सुमारे ७ हजाराहून अधिक हेक्टर क्षेत्र ओलिताखाली येणार आहे. मराठवाड्याच्या न्याय हक्काच्या ७ टीएमसी पाण्यापैकी २.२४ 'टीएमसी' पाणी या तीन तालुक्यात खळाळणार असल्याची माहिती मित्रचे उपाध्यक्ष तथा आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

राज्याचे जलसंपदा मंत्री ना. श्री. राधाकृष्ण विखे-पाटील यांच्या हस्ते निम्न तेरणा उपसा सिंचन योजनेच्या कामाचा शुभारंभ मागील महिन्यात करण्यात आला. त्यावेळी टप्पा क्रमांक सहा मधील कामांचा समावेश प्राधान्यक्रमात घेण्यात यावा अशी मागणी आपण मंत्री ना. विखे पाटील साहेब यांच्याकडे केली होती. त्याला आता मान्यता मिळाली आहे. त्यामुळे तुळजापूर तालुक्यातील १५, उमरगा तालुक्यातील १४ व लोहारा तालुक्यातील ६ अशा एकूण ३५ गावांतील सात हजारहून अधिक हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. या योजनेअंतर्गत रामदरा तलावातून ८५ किलोमीटर बंद कालव्याद्वारे कृष्णेचे पाणी सध्या अस्तित्वात असलेल्या तीन मध्यम प्रकल्प, पाच साठवण तलाव आणि नव्याने बांधकाम करण्यात आलेल्या दोन बॅरेजेस जोड कालव्याद्वारे एकूण दहा साठवण तलावांमध्ये भरण्यात येणार आहे. त्यातून या भागातील ३५ गावाच्या सिंचनाची सोय होणार आहे. या टप्प्यासाठी अंदाजे रुपये ४२० कोटी खर्च अपेक्षित असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी म्हटले आहे.

धाराशिव जिल्ह्यासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण असलेल्या कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्पाकडे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेबांचे विशेष लक्ष असून त्यांच्या सहकार्यामुळे ११,७०० कोटी रुपयांच्या कामांना महायुती सरकारने सुधारित प्रशासकीय मान्यता दिली व वेळोवेळी आवश्यक निधीची उपलब्धता करून दिली त्यानंतरच या कामांना गती मिळाली. कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्पाच्या योजना क्रमांक २ मधून टप्पा क्र. १ ते ५ चे काम अंतिम टप्प्यात आहे. कृष्णेचे २१ टीएमसी पाणी मराठवाड्याच्या न्याय हक्काचे आहे. त्यापैकी ७ टीएमसी पाण्यासाठी सध्या कामे सुरू आहेत. त्यापैकी २.२४ टीएमसी पाणी उपसा योजना क्रमांक दोनमधून तुळजापूर, उमरगा, लोहारा तालुक्यात आणण्यासाठी युद्ध पातळीवर कामे सुरू आहेत. सध्या ऊर्ध्व नलिका व जोड कालव्यांची कामे जवळपास पूर्ण झाली आहेत. उर्वरित कामेही प्रगतिपथावर आहे. सोलापूर जिल्ह्यातील मोहळ तालुक्यातील घाटणे बॅरेजच्या भोयरे पंप हाउसमधून तुळजाभवानी मातेच्या चरणी असलेल्या रामदरा तलावात पाणी लवकरच येणार असल्याचेही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी म्हटले आहे.

**१७ किलोमीटर पाइपलाइन**

उपसा सिंचन योजनेतील सहा पैकी चार प्रकल्पांतून १७ किलोमीटर पाइपलाइनद्वारे पाणी वाहून आणण्यात येणार आहे. यासाठी २५०० एमएम व्यासाचा व १५ एमएम जाडीच्या पत्र्याचा पाइप वापरला आहे. तसेच, ४६ किमी लांबीचा कालवाही आहे. पाइपलाइन आणि कालव्याच्या माध्यमातून ६३ किलोमीटर अंतर कापून हे पाणी तुळजाभवानी मातेच्या चरणी रामदरा तलावामध्ये दाखल होईल. यासाठी चार जोड कालवे असून सहा पंप हाउस आहेत. त्यापैकी पाच पंप हाउसचे काम पूर्ण झाले आहे.

**कृष्णेच्या पाण्यासाठी ६ टप्प्यांत होणार कामे**

सिंचन प्रकल्प क्र. २ चे काम ६ टप्प्यांत होत आहे. यामध्ये प्रकल्प टप्पा क्र. १ घाटणे, प्रकल्प टप्पा क्र. २ पडसाळी, प्रकल्प टप्पा क्र. ३ सावररगाव, प्रकल्प टप्पा क्र. ४ पांगरदरवाडी, प्रकल्प टप्पा क्र. ५ सिंदफळ, तर रामदरा प्रकल्प टप्पा क्रमांक ६ मध्ये येतो, म्हणजेच पाच टप्पे पूर्ण करून पाणी रामदरा तलावामध्ये दाखल होईल. प्रत्येक टप्प्यावर स्वतंत्र पंप हाउसची उभारणी करण्यात आली आहे.


**लातूर समाचार उस्मानाबाद**
**बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क**
**9422472502**
**9175325708**


# बालाजी मंदिरात गीतेतील श्लोकांचे पठण, भाविकांकडून भक्तीचा गजर



धाराशिव(प्रतिनिधी)-अनेक वर्षानंतर भाद्रपद महिन्यात आलेल्या एकादशीचा योग साधून शहरातील रामकृष्ण हरी सत्संग मंडळाच्या एकादशी ग्रुपतर्फे धाराशिव शहरातील मारवाड गल्लीतील बालाजी मंदिरात ७०० गीतेच्या श्लोकांचे पठणासह अथर्वशीर्ष पठणाने मंदिर दुमदुमले करण्यात आले. यावेळी पठणासाठी शहरातील १५० ते २०० महिला-पुरुष भाविक या पठणासाठी उपस्थित होते.

प्रारंभी सकाळी ११ वाजताच्या सुमारास पांडुरंगाच्या प्रतिमेचे पूजन सुमित्रा संभाजी पवार, प्रणिता सराफ, मंगल प्रयाग, विजया ताकभाते, विजयकुमार पटवारी यांच्या हस्ते प्रतिमा पूजन करण्यात आले. यानंतर ११.१५ ते दुपारी १.३० वाजता पर्यंत गीतापठण एकाच आवाजात करण्यात आले. दुपारी १.३० ते २ वाजता पर्यंत विष्णुसहस्त्रनाम व त्यानंतर गणपती, अथर्वशीर्ष पठण व महिषासुरमर्दिनी स्तोत्र पठण केले. यावेळी महिला भक्तांनी पांढऱ्या रंगाच्या साड्या तर पुरुषांनी पांढऱ्या रंगाचा विजार नेहरू शर्ट, पायजमा परिधान केला होता. यावेळी मारवड गल्लीतील वातावरण भक्तिमय झाले होते. पठणासाठी शामराव दहिटणकर, भारतदादा मसलेकर, बंडोपंत प्रयाग, हनुमान दास मिनीयार, मनीषा गोवर्धन, वासंती कुलकर्णी, शीला पाठक, प्रणिता सराफ, कुमार व्यास यांच्यासह मोठ्या संख्येने भाविक सहभागी झाले होते.

# पत्नीचा मृतदेह घरात, पतीचा शेतात गळफास



ढोकी(प्रतिनिधी)- धाराशिव तालुक्यातील कोल्हेगावातील घरात पत्नी मृत अवस्थेत आढळून आली. तर पती बाजूलाच असलेल्या शेतामध्ये गळफास घेतलेल्या स्थितीत आढळला. ही हृदयद्रावक घटना मंगळवारी सकाळी उघडकीस आली. या प्रकरणी ढोकी पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद झाली आहे. कोल्हेगावमधील श्रीकृष्ण तुकाराम टेकाळे (वय २७) याचा विवाह धाराशिव तालुक्यातील वाखरवाडी येथील साक्षी टेकाळे (वय २२) यांच्याशी चार वर्षांपूर्वी झाला होता. दोघांचा संसार सुखाचा चालू होता. या दांपत्यांना समर्थ नावाचा दीड वर्षाचा मुलगा आहे. श्रीकृष्ण टेकाळे हा धाराशिव येथे एका खासगी कंपनी कार्यालयात कामाला असण्याचे समजते. सोमवारी श्रीकृष्ण कामावरून घरी आला. दुसऱ्या दिवशी सकाळी घरातून लहान मुलगा रडत असल्याचा आवाज बाहेर आल्यानंतर शेजारी राहणाऱ्या श्रीकृष्णाच्या आईने जाऊन पाहिले असता सून मृतावस्थेत आढळून आली. त्यानंतर श्रीकृष्णाचा शोध घेतला असता ते शेतातील लिंबाच्या झाडाला गळफास घेतल्याच्या स्थितीत आढळला. घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलिस अधिकारी, ढोकीचे सहायक पोलिस निरीक्षक विलास हजारे यांनी घटनेची पाहणी केली. शवविच्छेदनासाठी दोन्ही मृतदेह ढोकी प्राथमिक आरोग्य केंद्रात पाठवण्यात आले. राहुल टेकाळे यांच्या फिर्यादीवरून अकस्मात मृत्यू म्हणून ढोकी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेचा तपास पोलिस उपनिरीक्षक माळी हे करत आहेत. माझ्या मृत्यूला कोणाला जिम्मेदार धरू नका माझ्या मृत्यूला कोणाला जिम्मेदार धरू नका, माझ्या मुलाचा सांभाळ चुलत्याने करावा. राम राम राम... असे लिहिलेली चिठ्ठी श्रीकृष्णच्या खिशात आढळली असल्याचे पोलिसांनी सांगितले.

## उस्मानाबाद शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२१४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५)
२२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

हे पत्र मुद्रक,प्रकाशक, संपादक व मालक दयानंद शंकरराव जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून समर्थनगर उस्मानाबाद येथे प्रकाशित केले. मो.नं.९४२२४७२५०२

Latur Samachar, Osmanabad Printed & Published by Jade Dayanand Shankarrao , Printed at Jade Offset Printers,Mitra Nagar Latur. and Published at Samarthnagar,Osmanabad. Editor : Jade Dayanand Shankarrao Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649